दैनिक www.epaper.rajyaloktantra.com

अ

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१५८ | शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### आरक्षण विरोधी आंदोलन करणाऱ्यांना जे पी नड्डा भेटले

दिल्ली: आरक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची मागणी करणाऱ्या आंदोलकांनी नवी दिल्लीतील जंतर मंतरवर आंदोलन केल्यानंतर काही दिवसांनी, केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी गुरुवारी आरक्षण सुधारणा कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली. या शिष्टमंडळात नीट परीक्षेस बसलेला हर्ष दुबे, रण बहादूर सिंग चौहान आणि मृत्युंजय पाठक यांच्यासह अनेक कार्यकर्ते होते. हे कार्यकर्ते भारतातील जाति–आधारित आरक्षण व्यवस्थेत बदल करण्याची आणि सर्व समुदायांना समान संधी मिळावी अशी मागणी करत आहेत. या बैठकीवर प्रतिक्रिया देताना, कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक आणि संयोजक अभिजित दीपके यांनी विचारले की, २१ ऑगस्ट रोजी जंतर मंतरवर झालेले आंदोलन कशासाठी होते, याचा उल्लेख जे पी नड्डा यांनी का केला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी याबद्दल काय विचार करतात, हे देशाला जाणून घ्यायचे आहे, असा सवालही यावेळी केला.

### मुंबईत १ सप्टेंबरपासून दूध ९ रुपयांनी महागणार!

मुंबई : दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमती तसेच पशुखाद्याच्या दरात झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर मुंबई दुग्ध उत्पादक संघाने दुधाच्या घाऊक दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दुधाचा सध्याचा घाऊक दर प्रतिलिटर ९३ रुपयांवरून १०२ रुपये करण्यात येणार आहे. मुंबईत हे नवे दर १ सप्टेंबर २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत लागू राहणार आहेत, अशी माहिती संघाचे अध्यक्ष चंद्रकुमार सिंग यांनी दिली. जोगेश्वरी येथील दिवाण सेंटर सभागृहात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत दुधाळ जनावरांच्या वाढत्या किमतींबरोबरच दाणा, तूरचुणी, चणाचुणी आदी पशुखाद्यांच्या दरात २५ टक्क्यांपर्यंत वाढ झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. तसेच चारा, पेंड आदींच्या किमतीतही वाढ झाल्याने दूध उत्पादकांवर आर्थिक भार पडत असल्याचे सांगण्यात आले. वाढत्या उत्पादन खर्चाचा विचार करून हा दर प्रतिलिटर ९ रुपयांनी वाढवून १०२ रुपये करण्यात आला असून, दूध उत्पादकांना वाढत्या खर्चातून दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई दुग्ध उत्पादक संघाकडून स्पष्ट करण्यात आले.

### रिक्षा चालकांना मराठीसाठी एक वर्ष मुदत–फडणवीस

मुंबई: अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना व्यवहारिक मराठी भाषा शिकण्यासाठी एक वर्षाची मुदत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी जाहीर केले. या काळात मराठी भाषेचे आवश्यक ज्ञान नसल्याबद्दल चालकांवर कोणतीही कारवाई केली जाणार नाही, असे त्यांनी सांगितले. मंत्री प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाखालील परिवहन विभागाने तपासणी मोहीम राबवून मराठी भाषेच्या परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या चालकांना नोटिसा बजावल्यानंतर ही घोषणा करण्यात आली आहे. हाजी अरफत शेख यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा आणि टॅक्सी चालक संघटनांच्या प्रतिनिधींनी आपली भेट घेतली, असे फडणवीस यांनी पत्रकारांना सांगितले. चालकांनी मूलभूत मराठी शिकावे या नियमाला त्यांनी पूर्ण पाठिंबा दर्शविला आणि ते ती भाषा शिकण्यास इच्छुक असल्याचेही त्यांनी नमूद केले. मात्र, चालकांचे वय वेगवेगळे आहे आणि अनेकांचे औपचारिक शिक्षण अनेक वर्षांपूर्वीच थांबले आहे, त्यामुळे कमी कालावधीत मराठी शिकणे कठीण असल्याचे या प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२७ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२१.५० क्विंटल | २,४६० | २,७२१ | २,६२५ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | २,१०० | ४,५०१ | ३,०२१ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : १०.०० क्विंटल | ६,४०१ | ७,३९९ | ६,९०० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ८०.५० क्विंटल | २,००० | २,८५० | २,५६९ |
| मुग: ०.५० क्विंटल | ८,८४० | ८,८४० | ८,८४० |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: ०.५० क्विंटल | ५,७०१ | ५,७०१ | ५,७०१ |

# सिंचन प्रकल्पांना मिळणार १५ हजार कोटींची गती

## नाबार्डकडून दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास शासनाची मंजुरी; ३.४५ लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील रखडलेल्या सिंचन प्रकल्पांना गती देण्याबरोबरच पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या कालवे आणि वितरण प्रणालीत सुधारणा करण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या निधीमुळे अपूर्ण प्रकल्प पूर्ण होण्यासोबतच उपलब्ध सिंचन क्षमतेचा अधिक कार्यक्षम वापर करणे शक्य होणार आहे.**

नाबार्डच्या कर्जातून जलसंपदा विभागाचे ५७ अपूर्ण सिंचन प्रकल्प किंवा प्रकल्प घटक पूर्ण करण्यात येणार आहेत. या कामांसाठी ८ हजार ९८२ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर राज्यात सुमारे ३.४५ लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून



रखडलेल्या प्रकल्पांना गती मिळून शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. याशिवाय पूर्ण झालेल्या १९३ सिंचन प्रकल्पांच्या कालवे आणि वितरण प्रणालीच्या सुधारणांसाठी ६ हजार १७.२४ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. या कामांमुळे निर्माण झालेली सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचनाखाली आलेले क्षेत्र यातील सुमारे ४.५१ लाख हेक्टरची तफावत कमी करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. कालवे, वितरण व्यवस्था आणि पाणीवाटप यंत्रणेत सुधारणा झाल्यास उपलब्ध पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होण्यास मदत होणार आहे. यापूर्वी मार्च २०२४ मध्ये पहिल्या टप्प्यात ७ हजार ५०० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यापैकी ३६ अपूर्ण प्रकल्प तसेच ६० प्रकल्पांच्या वितरण प्रणालीसाठी नाबार्डने ६ हजार ४७९.७६ कोटी रुपयांचे कर्जसहाय्य मंजूर केले आहे. संबंधित कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. जलसंपदा ▶▶ पान २ वर

# जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर?

## कुर्डुवाडीतून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल

दिल्ली । वृत्तसेवा

**राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारीपूर्वी घेण्यात याव्यात, अशी डेडलाईन सर्वोच्च न्यायालयाने घालून दिली आहे. त्यानुसार राज्यातील नगरपरिषदा–नगरपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या. आता राहिलेल्या जिल्हा परिषद निवडणुकांचा चेंडू सुप्रीम कोर्टात आहे. प्रशासकीय कारणास्तव १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात यावी, अशी मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दाखल केला आहे.**



**यामुळे जिल्हा परिषद निवडणुका पुन्हा लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

सोलापूर जिल्ह्यातील कुर्डुवाडी येथील जिल्हा परिषद, पंचायत समिती मेंबर्स असोसिएशनचे पदाधिकारी कैलास गोरे यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. नगरपालिका, महापालिकांप्रमाणेच ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेल्या जिल्हा परिषदांच्याही निवडणुका न्यायालयीन निर्णयास अधीन राहून ▶▶ पान २ वर

# सरसकट कर्जमुक्तीसाठी रविकांत तुपकर आक्रमक मुंबईत आंदोलनापूर्वी पोलिसांनी घेतले ताब्यात

मुंबई । प्रतिनिधी

सरसकट कर्जमुक्ती, नियमित कर्जदारांना २ लाख प्रोत्साहन अनुदान द्यावे, पीक विम्याचा हक्क आणि शेतकऱ्यांच्या सिबिलचा प्रश्न सोडवणे आदी मागण्यांसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांना गुरूवारी मुंबईत मंत्रालयासमोरील आंदोलनापूर्वी पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्यासह काही शेतकरी आणि त्यांच्या काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मंत्रालयाकडे जात असताना पोलिसांनी अडवून आम्हाला ताब्यात घेतले. ही कारवाई निषेधार्ह आहे. कितीही



दडपशाही केली तरी शेतकऱ्यांचा लढा थांबणार नाही, असा इशारा तुपकर यांनी दिला. थकित कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना दोन लाख देत असाल तर नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही २ लाख रुपये द्यावेत, अशी आमची मागणी आहे. याचा आर्थिक बोजा सरकारवर फार पडत नाही. आमच्या मागण्या रास्त आहेत. लोकशाही मार्गाने आंदोलन ▶▶ पान २ वर

# नेपाळच्या पुरात २८९ जणांचा मृत्यू तर २८८ भारतीय संपर्काबाहेर

दिल्ली । वृत्तसंस्था

**नेपाळमध्ये आलेल्या विनाशकारी पुरामुळे २८९ जणांचा मृत्यू झाला असून, या संकटात बेपत्ता झालेल्या २१ भारतीयांची सुटका करण्यात आली आहे, अशी माहिती सरकारने गुरुवारी दिली. त्याच वेळी, २८८ भारतीय नागरिक अद्याप संपर्काबाहेर आहेत.**

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सुटका करण्यात आलेले सर्व २१ भारतीय तामिळनाडूचे रहिवासी असून त्यांना भारतात परत आणले जात आहे. ''अनेक भारतीय सीमेच्या चिनी बाजूला, म्हणजेच



तिबेटमध्ये अडकले आहेत. २०० हून अधिक भारतीयांनी मदतीसाठी संपर्क साधला असून, त्यापैकी ९५ जण सध्या 'दारचेन' येथे आहेत,'' असे जयस्वाल यांनी सांगितले. रणधीर जयस्वाल यांनी पुढे सांगितले की, संपर्काबाहेर असलेल्या २८८ भारतीयांमध्ये नेपाळमधील पूरग्रस्त भागांपैकी एक असलेल्या 'त्रिशुली' येथील एका वीज प्रकल्पात काम करणाऱ्या ७३ लोकांचा समावेश आहे. सुरक्षित असलेल्या सुमारे २०० भारतीय नागरिकांनी बाहेर पडण्यासाठी (स्थलांतरासाठी) मदत मागितली आहे. यामध्ये तिबेटमधील 'दारचेन' या छोट्या गावातील ९५ जणांचा समावेश आहे, ▶▶ पान २ वर

# राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी तुकाराम मुंडे ॲक्शन मुडमध्ये !

## शाळेतील मध्यान्ह भोजनाची एफडीएकडून होणार तपासणी

मुंबई । प्रतिनिधी

शाळेतील मध्यान्ह भोजन विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित आणि दर्जेदार आहे की नाही, याची तपासणी आता अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) अधिक काटेकोरपणे केली जाणार आहे. शाळांमधील मध्यान्ह भोजनासोबतच अंगणवाडीतील आहार आणि केंद्रीय स्वयंपाकगृहांचाही तपासणीत समावेश करण्यात आला आहे.

मुंबईतील सुमारे आठ ते दहा केंद्रीय स्वयंपाकगृहांची तपासणी करण्यात आल्याची माहिती राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे



आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली. मुंबईतील प्रेस क्लबमध्ये आयोजित वार्तालापात ते बोलत होते. मध्यान्ह भोजन तयार करणाऱ्या केंद्रीय स्वयंपाकगृहांपासून ▶▶ पान २ वर

# बंगालमध्ये एसआयआरमधून उडालेली ९१ टक्के नावे पुन्हा मतदार यादीत

## आरटीआयमधून मोठा खुसाला;काँग्रेसकडून संताप

कोलकाता । वृत्तसंस्था

पश्चिम बंगाल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया राबवण्यात आली त्यावेळी जवळपास २७ लाख लोकांची नावे हटवण्यात आली होती. त्या २७ लाख लोकांना पुन्हा दावा करण्यासाठी आणि आक्षेप नोंदवण्याची संधी देण्यात आली




होती. निवडणूक आयोगाकडून स्थापन करण्यात आलेल्या न्यायाधिकाऱ्यांकडे लोकांनी आपला दावा आणि आक्षेप नोंदवला. निवडणूक आयोगाने आतापर्यंत अनेक प्रकरणे निकाली काढली असून आश्चर्याची बाब म्हणजे आतापर्यंत निकाली काढण्यात आलेल्या प्रकरणांमधील जवळपास ९१ टक्के प्रकरणे अशी आहेत ज्यात तक्रारदाराची ▶▶ पान २ वर

# पंचगंगावरील सांडपाणी प्रक्रियेला गती द्या!

## पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांची पंचगंगा नदीच्या प्रदूषणासंदर्भात चिंता

मुंबई । प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी नदी परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी उभारण्यात येत असलेल्या सामूहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया (सीईटीपी) प्रकल्पांच्या कामांना गती द्यावी. तसेच या कामास उशीर का झाला, याचा अहवाल देण्याचे निर्देश पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिले.




कोल्हापूरसह राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील रेड झोन, साखर कारखाने, प्रदूषित क्षेत्रातील सर्व सामूहिक औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता, प्रत्यक्ष वापर तसेच या प्रकल्पांचा वापर करणे अपेक्षित असलेल्या आणि प्रत्यक्ष वापर करणाऱ्या औद्योगिक घटक यांची पाहणी करून त्याचा अहवाल येत्या आठ दिवसांत सादर करण्याचे निर्देशही त्यांनी या वेळी दिले. कोल्हापूर ▶▶ पान २ वर

# अमेरिकेत आता रात्री १२ नंतर इन्स्टाग्राम-फेसबुकवर बंदी

## लहान मुलांसाठी मेटाचे नवे नियम लागू

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**सोशल मीडिया क्षेत्रातील दिग्गज कंपनी मेटाने सोशल मीडियामुळे लहान मुलांवर होणाऱ्या वाईट परिणामांबाबत जागृती करण्यासाठी, १८ अब्ज डॉलर्सपर्यंतची रक्कम भरण्यास आणि लहान मुलांच्या इन्स्टाग्राम आणि फेसबुक वापराबाबत महत्त्वाचे बदल करण्यास सहमती दर्शवली आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्नियातील ऑकलंड येथे सुरू असलेल्या एका महत्त्वपूर्ण खटल्यादरम्यान मेटाने हा निर्णय घेतला आहे.**



सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या वापरामुळे लोकांचा स्क्रीन टाइम वाढत आहे. या सर्वांवर निर्बंध आणण्यासाठी आता, इंस्टाग्राम आणि फेसबुक 'डिजिटल बेडटाइम' लागू करण्यात येणार आहे. या खटल्यात मेटावर असा आरोप होता की, मेटाच्या मालकीची फेसबुक आणि इन्स्टाग्राम ही ॲप्स मुले आणि किशोरवयीन मुलांना जाणीवपूर्वक व्यसनाधीन बनवत आहेत, ज्यामुळे तरुणांच्या संपूर्ण पिढीमध्ये चिंता आणि नैराश्याची समस्या निर्माण झाली आहे. या खटल्यातील करारानुसार मेटाला १८ वर्षांखालील मुलांकडून त्यांच्या ॲप्सच्या वापराबाबत अधिक कठोर निर्बंध लागू करणे बंधनकारक ▶▶ पान २ वर

### लाईक्स आणि रिॲक्शन्सची संख्या नाहीशी

रात्री आणि शाळेच्या वेळेत नोटिफिकेशन्ससुद्धा कमी केली जातील. मेटाकडून एक चाचणी सुरू केली जाणार आहे. सोशल मीडियावर मुलांची सक्रियता कमी करण्यासाठी, अल्पवयीन मुलांच्या पोस्टवरील लाईक्स आणि रिॲक्शन्सची संख्या नाहीशी केली जाईल. या वापरकर्त्यांसाठी कॉस्मेटिक-सर्जरी फिल्टर्सवर बंदी घातली जाईल, वय, खात्री प्रणाली आणि पालक नियंत्रणे अधिक मजबूत केली जातील.

# लोकसभेचे सध्याचे संख्याबळ २५ वर्षे कायम ठेवा

## मल्लिकार्जुन खर्गे यांचे मोदींना पत्र



दिल्ली । वृत्तसंस्था

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून विविध मागण्या केल्या. लोकसभेचे सध्याचे ५४३ जागांचे संख्याबळ आणखी २५ वर्षांसाठी कायम ठेवले जावे. केंद्र सरकारचे मतदारसंघ फेररचनेविषयीचे प्रस्ताव सर्व राजकीय पक्षांसमोर मांडले जावेत, असे आवाहन खर्गे यांनी केले आहे. ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# आजही व्यवस्था मागते एकलव्याचा अंगठा!

महाभारतातील द्रोणाचार्यांनी एकलव्याकडून गुरुदक्षिणा म्हणून त्याचा अंगठा मागितला. त्या एका मागणीने एकलव्याची धनुर्विद्येची क्षमता कायमची खुंटली. हजारो वर्षांनंतरही त्या कथेचा संदर्भ संपलेला नाही. कारण आजही व्यवस्था आपल्या सोयीच्या नियमांच्या नावाखाली वंचितांच्या हातातील संधी हिरावून घेताना दिसते. महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या शासकीय व अनुदानित वसतिगृहातील प्रवेशासाठी लादलेल्या वयोमर्यादेचा वाद हा त्याच मानसिकतेचा आधुनिक अवतार म्हणावा लागेल. प्रश्न एवढाचआजच्या व्यवस्थेतील द्रोणाचार्य कोण आणि आजचे एकलव्य कोण?

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहात राहण्याची वयोमर्यादा सरकारने सुरुवातीला २५ वर्षे निश्चित केली. विरोधाचा आवाज वाढल्यानंतर १४ ऑगस्ट २०२६ रोजी ती ३० वर्षे करण्यात आली. पण प्रश्न सुटला नाही. कारण अन्यायाची उंची पाच वर्षांनी वाढवून किंवा कमी करून न्याय निर्माण होत नाही. ज्यांच्या शैक्षणिक प्रवासालाच सामाजिक, आर्थिक आणि भौगोलिक अडथळ्यांनी उशीर लावला, त्यांच्या शिक्षणासाठी अशी कृत्रिम वयोमर्यादा ठरविणे हे वास्तवाकडे डोळेझाक करण्यासारखे आहे. ७ मे २०२६ च्या शासन निर्णयानंतर पुणे, नागपूर आणि अन्य ठिकाणी आदिवासी विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. त्यांचा प्रश्न केवळ वसतिगृहाचा नाही; तो शिक्षणाच्या समान संधीचा आहे. दुर्गम डोंगराळ भागात शाळा-कॉलेजपर्यंत पोहोचण्यासाठीच अनेक मुलांना संघर्ष करावा लागतो. माहितीचा अभाव, वाहतुकीची कमतरता, आर्थिक अडचणी आणि कौटुंबिक परिस्थिती यामुळे त्यांचे शिक्षण अनेकदा उशिरा सुरु होते. अशा विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने हात द्यायचा की त्यांच्या पायात आणखी बेड्या घालायच्या? विशेष म्हणजे, एकीकडे नोकरीच्या संधींसाठी वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत असू शकते आणि दुसरीकडे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी वसतिगृहाची दारे २५ किंवा ३० वर्षांनंतर बंद केली जातात. हा विरोधाभास सरकारच्या धोरणकर्त्यांना दिसत नाही का? रोजगारासाठी उशिरा संधी मिळू शकते, पण शिक्षणासाठी उशीर झाला तर त्याला शिक्षा का? शिक्षण ही मूलभूत गरज आहे की सरकारी कार्यालयातील एखाद्या फाईलवरच्या अटींचा विषय? या निर्णयाला विरोध वाढल्यानंतर हा मुद्दा राजकीय पातळीवरही पोहोचला. पुण्यातील 'छात्रों की गूंज' कार्यक्रमात राहुल गांधी यांनी हा प्रश्न उपस्थित केला आणि तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले. राष्ट्रीय पातळीवर विषय गाजल्यानंतर सरकारला वयोमर्यादेच्या निर्णयाला स्थगिती देण्याची वेळ आली. मग प्रश्न असा निर्माण होतो की, विद्यार्थ्यांचा आक्रोश सरकारला आधी का ऐकू आला नाही? आंदोलन, राजकीय दबाव आणि राष्ट्रीय चर्चा झाल्यानंतरच प्रशासनाला सामाजिक न्यायाची जाणीव होते का? याहून गंभीर बाब म्हणजे वसतिगृहातील विद्यार्थ्यांवर मोर्चे काढू नयेत, संघटना बांधू नयेत, माध्यमांशी बोलू नये अशा स्वरूपाच्या अटी लादल्या गेल्याची चर्चा आहे. जर विद्यार्थी सरकारी वसतिगृहात राहतो म्हणून त्याचा आवाजही सरकारच्या परवानगीवर अवलंबून असेल, तर ही लोकशाहीची कोणती व्याख्या? वसतिगृह हे विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे आश्रयस्थान असावे; त्याला गप्प करणारे प्रशासनिक छावणीस्थान नव्हे. देवेंद्र फडणवीस स्वत:ला द्रोणाचार्य समजतात का आणि आदिवासी विद्यार्थ्यांकडून आधुनिक 'गुरुदक्षिणा' म्हणून त्यांचा अधिकार, आवाज आणि संधीचा अंगठा मागतात का, हा प्रश्न आज विचारला पाहिजे. व्यक्तीवर टीका करण्यापेक्षा येथे महत्त्वाचे आहे ते सत्तेचे मानसिकतेचे परीक्षण. सरकार कोणाचेही असोजर धोरणांचा परिणाम असा होत असेल की वंचित विद्यार्थ्यांची प्रगती थांबते, तर त्या धोरणांना प्रश्न विचारणे अपरिहार्य आहे. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणणे हा सरकारचा उपकार नाही; ते राज्याचे घटनात्मक आणि सामाजिक कर्तव्य आहे. त्यामुळे शिक्षणाच्या वाटेवर अटींचे काटे पेरण्याऐवजी शासनाने त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत. वयोमर्यादा, निवासाच्या अटी किंवा अभिव्यक्तीवरची बंधनेया प्रत्येक निर्णयाची कसोटी एका प्रश्नावर झाली पाहिजे : यामुळे आदिवासी विद्यार्थ्याला पुढे जाण्याची संधी मिळते की तो पुन्हा एकदा एकलव्य बनतो? महाभारतात एकलव्याचा अंगठा कापला गेला; आजच्या लोकशाहीत तो अंगठा कापण्याची गरज नाही. नियमांची अशी रचना करा की त्याच्या हातातील संधीच निसटेलइतके पुरेसे आहे. म्हणूनच सरकारने द्रोणाचार्यांची भूमिका सोडून राज्यकर्त्यांची भूमिका स्वीकारण्याची वेळ आली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांकडून गुरुदक्षिणा मागू नका; त्यांच्या हातात शिक्षणाचे धनुष्य द्या, संधीचा बाण द्या आणि त्यांना स्वत:चे लक्ष्य गाठू द्या.

# ५ दिवसांच्या बँकिंगसाठी जिल्हाभरात बँक कर्मचाऱ्यांचे जोरदार आंदोलन

## मागण्या मान्य न झाल्यास सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये देशव्यापी संपाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**आठवड्यातील पाच दिवस बँकिंग व्यवस्था लागू करावी, सर्व शनिवारची सुट्टी जाहीर करावी, तसेच बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांची तातडीने पूर्तता करावी, या प्रमुख मागण्यांसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या राष्ट्रीय आवाहनानुसार गुरुवारी, २७ ऑगस्ट रोजी बीड जिल्ह्यात बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जोरदार आंदोलन केले. बीड शहरासह अंबाजोगाई, परळी, केज आणि जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये बँक कर्मचारी एकवटले असून, सरकारच्या धोरणांविरोधात घोषणाबाजी करीत निदर्शने करण्यात आली.**

या आंदोलनामुळे विविध बँकांच्या परिसरात काही काळ वातावरण आंदोलनमय झाले होते. स्टेट बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन () आणि स्टेट बँक ऑफ इंडिया स्टाफ युनियन यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनाला बँक ऑफ महाराष्ट्र, महाराष्ट्र ग्रामीण बँक, पंजाब नॅशनल बँक यांसह इतर बँकांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विविध बँकांतील कर्मचारी एकाच व्यासपीठावर येत आपल्या मागण्यांसाठी आवाज उठवत असल्याने बँक कर्मचाऱ्यांची एकजूट या आंदोलनातून ठळकपणे दिसून आली. बीड येथे झालेल्या निदर्शनांदरम्यान एसबीआय ऑफिसर्स असोसिएशनचे रिजनल प्रेसिडेंट कॉम्रेड जयेश भोसले, एसबीआय स्टाफ युनियनचे रिजनल सेक्रेटरी कॉम्रेड अनंता वालेकर, कॉम्रेड विनोद मुळेकर आणि कॉम्रेड विपिन गिरी यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना कॉम्रेड जयेश भोसले यांनी पाच दिवसांच्या बँकिंगच्या मागणीचा मुद्दा स्पष्ट केला. आयबीए आणि बँक कर्मचारी संघटनांदरम्यान झालेल्या १२ व्या द्विपक्षीय करारामध्ये सर्व शनिवार सुट्टी देण्याबाबत सहमती झाली आहे. त्याबदल्यात सोमवार ते शुक्रवार दररोज अतिरिक्त ४० मिनिटे काम करण्याची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या प्रस्तावाला केंद्र सरकारकडून अद्याप अंतिम मंजुरी मिळालेली नसल्याने बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे त्यांनी सांगितले. पाच दिवसांचे बँकिंग लागू झाल्यास




बँक कर्मचाऱ्यांना काम-जीवन संतुलन राखण्यास मदत होईल, तसेच वाढत्या कामाच्या ताणातून काही प्रमाणात दिलासा मिळेल, असा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. देशातील अनेक क्षेत्रांमध्ये पाच दिवसांचा कार्यसप्ताह लागू असताना बँकिंग क्षेत्राला अद्याप त्याचा लाभ मिळत नसल्याने सरकारने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात आली. कॉम्रेड अनंता वालेकर यांनी यावेळी आक्रमक भूमिका मांडत बँक अधिकारी व कर्मचारी आपल्या हक्काच्या मागण्यांसाठी कोणत्याही परिस्थितीत मागे हटणार नसल्याचा इशारा दिला. सरकारने पाच दिवसांचा कार्यसप्ताह तातडीने लागू करावा, अशी मागणी त्यांनी केली. तर कॉम्रेड विनोद मुळेकर आणि कॉम्रेड विपिन गिरी यांनी बँक कर्मचाऱ्यांच्या इतर प्रलंबित प्रश्नांकडे लक्ष वेधत संघटनांच्या पुढील आंदोलनाची दिशा स्पष्ट केली. दरम्यान, आंदोलनाच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. 'पाच दिवसांचे बँकिंग तात्काळ लागू करा', 'बँक कर्मचारी-अधिकारी एकजुटीचा विजय असो', 'यूएफबीयू झिंदाबाद', 'नया पीएलआय नियम मागे घ्या' अशा घोषणांनी बँक परिसर दुमदुमून गेला. पाच दिवसांच्या बँकिंगबरोबरच पीएलआय योजनेतील कथित भेदभाव दूर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी लागू करण्यात आलेल्या परफॉर्मन्स लिंक्ड इंसेंटिव्हच्या नियमांबाबत कर्मचारी संघटनांनी आक्षेप घेत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी समान आणि न्याय्य नियम असावेत, अशी भूमिका मांडली. याशिवाय जुन्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनचे अद्ययावतीकरण करावे, राष्ट्रीय पेन्शन प्रणालीअंतर्गत (एनपीएस) असलेल्या कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन योजनेचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, यासह विविध मागण्याही आंदोलनाच्या माध्यमातून पुढे करण्यात आल्या. बँकिंग क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारने गांभीर्याने पाहून चर्चेच्या माध्यमातून तोडगा काढावा, अशी मागणी संघटनांनी केली. दरम्यान, हे आंदोलन केवळ एक दिवसापुरते मर्यादित नसून च्या टप्प्याटप्प्याने सुरू असलेल्या आंदोलनाचा हा एक भाग असल्याचे सांगण्यात आले. मागण्या मान्य न झाल्यास सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात देशभरात व्यापक आंदोलन आणि देशव्यापी बँक संप पुकारण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे. त्यामुळे केंद्र सरकार या मागण्यांबाबत कोणती भूमिका घेते आणि पुढील काळात बँक कर्मचारी संघटना आंदोलनाची कोणती दिशा ठरवतात, याकडे आता बँकिंग क्षेत्राचे लक्ष लागले आहे. बीड जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये झालेल्या या आंदोलनातून बँक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी एकजुटीची ताकद दाखवून दिली. आता सरकारने या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन पाच दिवसांच्या बँकिंगचा मार्ग मोकळा करावा, अशी अपेक्षा बँक कर्मचारी संघटनांकडून व्यक्त करण्यात आली.

# यशवंतराव चव्हाण नाट्यगृह तोडफोड व चोरी प्रकरण: शिवाजीनगर पोलिसांची धडक कारवाई, तिघांना बेड्या

बीड । प्रतिनिधी

**येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात दारू पिण्यास मज्जाव केल्याच्या रागातून तोडफोड, कर्मचाऱ्याला जिवे मारण्याची धमकी आणि साऊंड सिस्टीमची चोरी करणाऱ्या तिघांना शिवाजीनगर पोलिसांच्या तपास ३पथकाने अवघ्या काही तासांत जेरबंद केले आहे.**

दिनांक २५ ऑगस्ट रोजी रात्री यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या पार्किंग परिसरात काही तरुण मद्यप्राशन करत बसले होते. नाट्यगृहाच्या पर्यवेक्षकाने त्यांना हटकले असता, आरोपींनी त्यांना थेट जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर रात्री ९:०० वाजेच्या सुमारास आरोपींनी मुख्य प्रवेशद्वाराची काच फोडून आत प्रवेश केला. त्यांनी नाट्यगृहातील दोन 'क्यूएससी' () कंपनीचे महागडे मॉनिटर साऊंड चोरून नेले. एवढेच नव्हे तर बाहेर



पडताना त्यांनी नगर परिषदेच्या घंटागाडीच्या काचा फोडून नुकसान केले. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये ( व शस्त्र अधिनियम) गुन्हा दाखल करण्यात आला होता. अटक आरोपींची नावे: प्रतीक (उर्फ गड्या) जगन्नाथ गायकवाड (वय १८ वर्षे ४ महिने, र४१. बौद्ध विहार जवळ, इंदिरानगर, बीड) रोहन दहिवाळ (वय १९ वर्षे, रा. विवेकानंद विद्यालय, गोविंद नगर, धानोरा रोड, बीड) रितेश वीर (वय २४ वर्षे, रा. हाऊसिंग कॉलनी, इंदिरानगर, बीड) तपास पथकाची कामगिरी: गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी संशयितांचा माग काढून तिघांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सपोनी प्रल्हाद मुंडे, पोलीस अंमलदार रवी आघाव, अनंत गिरी, अनिल घटमळ, गणेश आगे आणि विजय बोडके यांनी केली. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

# रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बीड पोलिसांची अनोखी भेट; चोरीस गेलेले सोने महिलांना परत

बीड । प्रतिनिधी

**रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला बीड पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपत चोरीस गेलेले सोने मूळ मालक महिलांना परत मिळवून दिले आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या या विशेष उपक्रमामुळे ऐन सणाच्या दिवशी कष्टाचे दागिने परत मिळाल्याने संबंधित महिलांच्या चेहऱ्यावर मोठा आनंद व समाधान पाहायला मिळाले.**

पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड येथे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या हस्ते कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून दोन पीडित महिलांना त्यांचे दागिने सुपूर्द करण्यात आले. दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांची तत्पर उकल राजीव गांधी चौक घरफोडी: राजीव गांधी चौक परिसरातील एका घरातून सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेल्याची नोंद झाली होती. पोलिसांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करत तब्बल ३ लाख ३७ हजार २८० रुपये किमतीचे सोन्या-



चांदीचे दागिने हस्तगत केले. बस स्थानकावरील चोरी: परळी येथील रहिवासी आरती दीपक अरबुने या बीड बस स्थानकावरून बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्यांनी त्यांचे २८ हजार ९८५ रुपये किमतीचे मिनी गंठण लंपास केले होते. पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली व चोरीस गेलेले मिनी गंठण जप्त केले. सणाच्या तोंडावर आपले दागिने परत मिळाल्याबद्दल दोन्ही महिलांनी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत आणि बीड पोलिसांचे आभार मानले. नागरिकांची चोरीस गेलेली मालमत्ता शोधून ती परत मिळवून देण्यासाठी पोलीस दल सातत्याने कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.तपास पथकाची उल्लेखनीय कामगिरी ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी ऋषिकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, अंमलदार विलास कांदे, राजाभाऊ जाधव, महिला अंमलदार सीमा गायकवाड, रामलीला गुंजाळ, शिवा घोलप, अनंत गिरी आणि ज्ञानेश्वर मराडे यांनी पार पाडली.

पान १ वरून...

## सिंचन प्रकल्पांना मिळणार

विभागाच्या प्रकल्पांमधून जून २०२५ अखेर राज्यात सुमारे ५८ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. मात्र, प्रत्यक्षात सुमारे ४६ लाख हेक्टर क्षेत्रच सिंचनाखाली आले आहे. त्यामुळे निर्माण झालेली क्षमता आणि प्रत्यक्ष सिंचन यातील अंतर मोठे आहे. नव्या निधीतून कालवे व वितरण प्रणालीच्या सुधारणा केल्यामुळे हे अंतर कमी करण्यास मदत होईल. रखडलेले प्रकल्प पूर्ण होणे आणि जुन्या प्रकल्पांच्या वितरण व्यवस्थेत सुधारणा होणे, या दोन्ही माध्यमातून राज्यातील सिंचन व्यवस्थेला चालना मिळणार आहे. परिणामी उपलब्ध जलसाठ्याचा अधिक कार्यक्षम वापर होऊन सिंचनाखालील क्षेत्र वाढण्याची अपेक्षा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेसह शेतकऱ्यांच्या उत्पादनक्षमतेलाही याचा फायदा होऊ शकतो.

--------------

## सरसकट कर्जमुक्तीसाठी रविकांत तुपकर आक्रमक

करणे हा आमचा अधिकार आहे. आयकर भरणारे व पुनर्गठित कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफी मिळावी. २०१९ पूर्वीच्या वंचित शेतकऱ्यांनाही कर्जमुक्ती द्या, अशी मागण्या त्यांनी सरकारपुढे ठेवल्या आहेत. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी शेवटपर्यंत लढणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पोलिसांनी ताब्यात घेण्यापूर्वी माध्यमांशी बोलताना रविकांत तुपकरांनी सरकारच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार असतानाही सरकारकडून पोलिसांच्या माध्यमातून दडपशाही केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला. कार्यकर्त्यांची धरपकड, वाहनांची अडवणूक आणि आंदोलन रोखण्यासाठी लावण्यात आलेला प्रचंड पोलिस बंदोबस्त हा सरकारच्या दडपशाहीचा प्रकार असल्याचे सांगत त्यांनी याचा निषेध नोंदवला.

-------------

## जिल्हा परिषद निवडणुका

घ्याव्यात, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयात नव्याने ही याचिका दाखल झाली असून त्यावर सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुका ३१ जानेवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगास दिले आहेत. ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा वाद सर्वोच्च न्यायालयात पोहोचल्यानंतर सुरुवातीस सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ५० टक्के आरक्षण मर्यादेत घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते; मात्र कालांतराने ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाले असतानाही नगरपालिका, नगरपंचायती आणि नागपूर, चंद्रपूर महापालिकेच्या निवडणुका न्यायालयीन अंतिम निर्णयाच्या अधीन राहून घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले; मात्र याच आदेशात जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या बाबतीत केवळ ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणार्याच जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारीला होणार आहेत. तसेच ५० टक्के आरक्षणाची मर्यादा पाळणाऱ्या १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत येणार्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात घेण्याची आणि त्याचा निवडणूक कार्यक्रम पुढील आठवड्यात घोषित करण्याची तयारी आयोगाने केली होती. पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतील जिल्हा परिषदांच्या निवडणुका होत असताना ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडल्यामुळे इतर २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास आयोगाने असमर्थता दाखविली होती. या २० मधील बहुतांश जिल्हा परिषदा विदर्भ आणि मराठवाड्यातील असल्याने तेथील आरक्षणाचा गुंता सुटल्याशिवाय निवडणुका घेता येणार नाहीत, अशी भूमिका आयोगाने घेतली होती. आता नव्याने याचिका दाखल झाल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

------------------

## राज्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी

ते विद्यार्थ्यांच्या ताटापर्यंत अन्नाची गुणवत्ता आणि सुरक्षितता कायम राहणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित स्वयंपाकगृहांची स्वच्छता, अन्न तयार करण्याची पद्धत, कच्च्या मालाचा दर्जा, साठवणूक तसेच अन्नसुरक्षा नियमांचे पालन याची तपासणी केली जात आहे. शाळा आणि अंगणवाडीमध्ये वितरित होणाऱ्या आहाराचे नमुने घेऊन त्यांची तपासणीही केली जात आहे. मुंढे यांनी सांगितले की, शाळेतील मध्यान्ह भोजनाची तपासणी केवळ तक्रार आल्यानंतरच केली जाणार नाही. अन्नसुरक्षेच्या दृष्टीने नियमित तपासणी आणि नमुने घेण्याची प्रक्रिया सुरू राहणार आहे, शाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहारात संतुलन राखण्यावरही एफडीएने भर दिला आहे. जास्त चरबी, साखर आणि मीठ असलेले पदार्थ टाळून पौष्टिक आहार देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. शाळेतील मध्यान्ह भोजन केवळ विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचले म्हणजे प्रक्रिया संपत नाही. अन्न कुठे तयार होते, कोणत्या कच्च्या मालाचा वापर केला जातो, त्याची साठवणूक कशी केली जाते आणि शाळेपर्यंत ते कोणत्या पद्धतीने पोहोचवले जाते, याचीही तपासणी केली जात आहे. त्यामुळे केंद्रीय स्वयंपाकगृहापासून विद्यार्थ्यांच्या ताटापर्यंत संपूर्ण अन्नसाखळी एफडीएच्या तपासणीच्या कक्षेत असेल, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

**नमुने घेण्यास सुरूवात...**

अंगणवाडी आणि शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या अन्नाची गुणवत्ता तपासण्यासाठी नमुने घेण्यास सुरुवात झाली असून, मुंबईत गेल्या आठवड्यात काही अंगणवाडी केंद्रे आणि शाळांमध्ये तपासणी करण्यात आली. यावेळी अन्नाची गुणवत्ता तसेच संतुलित आहाराबाबत संबंधितांना मार्गदर्शन करण्यात आले. दर महिन्याला या केंद्रांची तपासणी केली जाणार असून, गरजेनुसार तपासणीची वारंवारता वाढविण्यात येईल, अशी माहिती राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली.

------------

## नेपाळच्या पुरात २८९ जणांचा मृत्यू

जे नेपाळमध्ये प्रवेश करण्यासाठी 'हिल्सा'कडे जात आहेत; तसेच 'जिलोंग' शहरात चार, 'सागा'कडे जाण्याच्या मार्गावर 'झुटुलफुक' येथे ३० आणि इतर ठिकाणी प्रवास करणारे आणखी ६०-७० जण यांचाही यात समावेश आहे. हिमालयीन नदीजवळ हिमस्खलन झाल्यामुळे नेपाळ आणि तिबेटच्या काही भागांत अचानक विनाशकारी पूर आला. तिबेट आणि नेपाळ यांच्यातील सीमावर्ती व्यापार केंद्र असलेल्या 'ग्यिरोंग पोर्ट'या शहराला पुराचा पहिला फटका बसला आणि त्यानंतर पाण्याचा प्रचंड प्रवाह पुढे जाऊन त्याने सर्वत्र हाहाकार माजवला. या पुरामुळे अनेक वस्त्या पाण्याखाली गेल्या आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली; तसेच नेपाळमधील रस्ते, पूल आणि जलविद्युत प्रकल्पांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. नेपाळचे परराष्ट्र मंत्री शिशिर खनाल यांनी सांगितले की, अधिकारी अजूनही या आपत्तीची व्याप्ती समजून घेण्याचा प्रयत्न करत आहेत. नेपाळ आणि तिबेटमध्ये मिळून सुमारे १,५०० लोक (ज्यामध्ये किमान ८०० परदेशी नागरिकांचा समावेश आहे) बेपत्ता आहेत. ''हजारो कुटुंबांनी आपली घरे गमावली आहेत आणि ते सध्या बेपत्ता आहेत. आम्ही अजूनही या आपत्तीची पूर्ण व्याप्ती जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत,'' असे ते म्हणाले.

**मृतांचा एकूण आकडा ३५९ वर**

नेपाळमध्ये भोटेकोशी आणि त्रिशूली नद्यांना आलेल्या भीषण पुरामुळे मोठी जीवितहानी झाली आहे. पोलिस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, मृतांचा आकडा ३५३ वर पोहोचला असून, ताज्या माहितीनुसार तो ३५९ पर्यंत वाढला आहे. शेकडो जण अद्याप बेपत्ता आहेत. विविध यंत्रणांच्या आकडेवारीनुसार बेपत्तांची संख्या वेगवेगळी असून ८०० हून अधिक नागरिक बेपत्ता असल्याचे यापूर्वी सांगण्यात आले होते. दरम्यान, भोटेकोशी नदी परिसरात पुन्हा पुराचा धोका निर्माण झाला आहे. उपग्रह छायाचित्रांमध्ये पूरग्रस्त ठिकाणी तलाव तयार झाल्याचे दिसून आले आहे. हा तलाव वेगाने वाढत असून, फुटण्याची शक्यता असल्याने नेपाळच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेने नागरिक आणि बचाव पथकांना नदीकाठापासून दूर राहण्याचा इशारा दिला आहे.

----------------

## पंचगंगावरील सांडपाणी

जिल्ह्यातील पंचगंगा नदीच्या प्रदूषणासंदर्भात मुंडे यांनी मंत्रालयात बैठक घेतली. या वेळी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार अमल महाडिक, राहुल आवाडे, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव राहुल रेखावार आदी उपस्थित होते. तर राजेंद्र पाटील यड्रावकर, माजी खासदार राजू शेट्टी तसेच कोल्हापूर महापालिका आयुक्त राजेंद्र भीरूड आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. कोल्हापूरमधील पंचगंगा नदीमध्ये होणाऱ्या प्रदूषणासंदर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने सादरीकरणाद्वारे माहिती देण्यात आली. तसेच कोल्हापूर शहर, इचलकरंजी तसेच नदी परिसरातील, नगरपालिका, ग्रामपंचायती तसेच औद्योगिक क्षेत्रातून पंचगंगा नदीमध्ये जाणाऱ्या सांडपाण्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचा आढावा घेण्यात आला. प्रस्तावित नदी पुनरुज्जीवन प्राधिकरणाच्या कामामध्ये पंचगंगा नदीचे प्राधान्याने समावेश करून कामे हाती घेण्यात येणार असल्याचे मुंडे यांनी सांगितले. मुंडे म्हणाल्या, की स्थानिक स्वराज्य संस्था तसेच औद्योगिक विकास महामंडळाच्या मार्फत सुरू असलेली मंजूर सामूहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची यांत्रिकीकरणाची कामे आणि त्यांना जोडणाऱ्या पाइपलाइनची कामे एकाच वेळी सुरू राहिली पाहिजेत. औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया झाली तरी त्याची विल्हेवाट लावताना ते शेतजमिनी, नाले अथवा अन्य मार्गांनी पुन्हा नदीत पोहोचण्याची शक्यता असते. त्यामुळे केवळ प्रक्रिया प्रकल्पांचे निष्कर्ष न पाहता सांडपाण्याची प्रत्यक्ष विल्हेवाट, वाहतुकीदरम्यान होणारी गळती आणि अनधिकृत विसर्ग यावरही प्रभावी देखरेख ठेवण्याची आवश्यकता आहे, असेही मंत्री मुंडे म्हणाल्या.

-------------

## बंगालमध्ये एसआयआरमधून उडालेली ९१

बाजू ग्राह्य मानून त्यांचा पुन्हा मतदार यादीत समावेश करण्यात आला आहे. आटीआय च्या माध्यमातून हा आकडा समोर आल्यानंतर काँग्रेस पक्ष जाम भडकला आहे. काँग्रेसने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार टीका केली असून, काँग्रेसने पश्चिम बंगालमध्ये पंतप्रधान आणि मुख्य निवडणुक आयुक्तांनी मिळून एसआयआर केले अन् निवडणूक चोरी केली. आता त्याचे पुरावे समोर येत आहेत अशी टीका केली. निवडणूक आयोगाने दिलेल्या आकड्यानुसार न्यायाधिकाऱ्यांनी आतापर्यंत ८२,७८२ अपील निकाली काढल्या. त्यातील ९१ टक्के म्हणजे ७५,४४३ नावे पुन्हा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहेत. फक्त ८.८६ टक्के नावे म्हणजे फक्त ७,४४९ दावे रद्द करण्यात आले आहेत. निवडणुकीपूर्वी जी नावे डिलीट केली होती. ती पुन्हा निवडणूक आयोगाच्या लिस्टमध्ये सामील झाली आहेत. ही ज्ञानेश कुमार यांची मत चोरीची सिस्टम आहे. ज्याद्वारे लोकांचा मतदानाचा अधिकार काढून घेतला जात आहे. २ महिन्यापूर्वी पश्चिम बंगालच्या एका सरकारी कार्यालयाला आग लागली होती. त्यात ४००० इव्हीएम मिशन जळून खाक झाले. याच इव्हीएमचा वापर विधानसभा निवडणुकीवेळी झाला होता. बंगालमध्ये मोठी मत चोरी झाली आहे. असा दावा काँग्रेसने केला आहे. काँग्रेस खासदार इशा खान चौधरी यांनी सांगितले की, जे अपील निकाली काढले त्यातील ९१ टक्के नावे पुन्हा मतदार यादीत आले आहेत. यावरून सुरूवातीला योग्य आणि खऱ्या मतदारांची नावे अयोग्यपद्धतीने मतदार यादीतून काढून टाकली हे सिद्ध होते. या प्रक्रियेमुळे अनेक नागरिक भयभीत झाले. अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले. सरकारी योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी आल्या, अनेकांना नोकरीसाठी परदेशात देखील जाता आले नाही, असा दावा करण्यात आला आहे.

------------

## लोकसभेचे सध्याचे

महिला आरक्षणाची अंमलबजावणी आणि मतदारसंघ फेररचना याबाबींना जोडणारे विधेयक पुन्हा आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे संकेत मिळत आहेत. त्या पार्श्वभूमीवर, खर्गे यांनी मोदींना पाठवलेल्या पत्राचे महत्व वाढले आहे. मतदारसंघ फेररचनेशी संबंधित प्रस्तावांवर चर्चा करण्यासाठी सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी. त्या प्रस्तावांचा अभ्यास करण्यासाठी राजकीय पक्ष आणि राज्य सरकारांना पुरेसा वेळ दिला जावा. महिलांसाठीच्या एक-तृतीयांश आरक्षणाची अंमलबजावणी २०२९ यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीपासून केली जावी, अशा मागण्या खर्गे यांनी केल्या. सरकारने याआधी लोकसभेत १७ एप्रिल यादिवशी महिला आरक्षण अंमलबजावणीसाठी मतदारसंघ फेररचनेचा समावेश असणारे घटनादुरूस्ती विधेयक मांडले. मात्र, सरकार आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत गाठू न शकल्याने ते विधेयक फेटाळले गेले.

----------------

## अमेरिकेत आता रात्री १२ नंतर

करण्यात आले आहे. मध्यरात्रीपासून ते पहाटे ६ वाजेपर्यंत फेसबुक आणि इंस्टाग्राम १८ वर्षांखालील मुलांसाठी बंद असेल. शाळेच्या वेळेत नोटिफिकेशन्स डीफॉल्ट स्वरूपात बंद राहतील आणि किशोरवयीन मुले दिवसातून केवळ दोन तास इन्स्टाग्राम आणि फेसबुक ॲप्स वापरू शकतील. पण, एखाद्या पालकाने हे नियंत्रण बंद केल्यास ही अट लागू होणार नाही. तसेच, किशोरवयीन मुलांच्या पोस्ट्सवरील 'लाईक्स'ची संख्या डीफॉल्ट स्वरूपात लपवली जाईल. हा करार अशा प्रकारे तयार करण्यात आला आहे की, जर मेटाचे स्पर्धक असलेल्या युट्यूब आणि टिकटॉक या कंपन्यांनी या अटी मान्य केल्या, तर त्यातील नियम अधिक कठोर होतील. यामध्ये १८ वर्षांखालील मुलांसाठी रात्री १० ते सकाळी ७ या वेळेत सेवा बंद (ब्लॅकआउट) राहील आणि प्रत्येक ॲपचा वापर दिवसाला जास्तीत जास्त एका तासापर्यंत मर्यादित केला जाईल. जर या दोन कंपन्यांनीही हीच नवीन धोरणे स्वीकारली आणि तितकीच रक्कम भरली, तर मेटाला अतिरिक्त ५.३ अब्ज डॉलर्स भरावे लागतील.


## टी.सी.हरवला आहे

सारिका चुनीलाल खिंवसरा या विद्यार्थिनीचा इयत्ता दहावी पासचा टी.सी. निमगाव ते बीड एसटी प्रवासात दरम्यान हरवला आहे ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करा.

:::: संपर्क ::::


सारिका चुनीलाल खिंवसरा, मो. ९८९००६७२११

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट २०२६



## प्रतिभा शेकडे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्हा परिषदेचे माता आणि बाल संगोपन अधिकारी तथा जिल्हा आरोग्य संघटनेचे राज्य उपाध्यक्ष डॉ. सचिन शेकडे यांच्या मातोश्री प्रतिभा देवीदासराव शेकडे यांचे मंगळवार दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता दुःखद निधन झाले. प्रतिभा शेकडे ह्या मूळ आष्टी येथील रहिवासी असून त्या सध्या बीड येथील भक्ती कन्स्ट्रक्शन भागात राहत होत्या. त्यांच्या पार्थिवावर बीड येथील मोंढा स्मशानभूमीत मंगळवारी सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

## जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून अनुदान द्या-आंधळे

बीड । प्रतिनिधी

आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याला पुन्हा एकदा कोरडा दुष्काळ आणि आर्थिक संकट आले आहे तरी देखील मान्सून ने मारलेल्या दांडीमुळे संपूर्ण जिल्ह्याला दुष्काळाच्या तीव्र झळा बसत आहेत पावसाच्या प्रदीर्घ पानामुळे आणि रगरगत्या उकड्यामुळे शेतातील पिके ऐन फुलोरा आणि फळ लागण्याच्या टप्प्यात असताना करपली आहेत पाण्याअभावी अनेक ठिकाणी पिकांनी माना टाकल्या असून या



परिस्थितीमुळे हजारो शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू येण्याची वेळ आली आहे शासकीय आकडेवारीनुसार संपूर्ण मान्सून हंगामा जिल्ह्याची पावसाची सरासरी ५६६.१ मिलिमीटर असताना २२ ऑगस्ट पर्यंत केवळ २७४ मिलिमीटर म्हणजे४८.४% पाऊसाची नोंद झाली

गेल्यावर्षी याच काळात ६८% पाऊस झाला होता मात्र यंदा जमिनीतील नैसर्गिक ओलावाही पूर्णपणे सुकला आहे गेवराई तालुक्यात तर सर्वात वाईट परिस्थिती आहे तेथे अवघा ३६.५ टक्के पाऊस झाला आहे आष्टी ३८.३% वडवणी ३९.७% अंबाजोगाई ४३.६% आणि बीड तालुक्यातही ४४% पावसाची नोंद झाली आहे. स्थिती गंभीर आहे पावसाच्या या दांडीमुळे शेतातील पिकांचे गणित पार कोलमडले आहे जिल्ह्यात तब्बल सात लाख ६१ हजार हेक्टर वर खरिपाची पेरणी झाली आहे तीन लाख पंधरा हजार हेक्टर वरील सोयाबीन फुलोऱ्यात असताना अळीने ते फस्त केले आहे दोन लाख ४९ हजार हेक्टर वरील कापूस पाण्याअभावी वाळू लागला आहे मका पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव झाला आहे तर पाण्याच्या ताना मुळे बाजरीची ताटे बारीक पडली आहेत तुर, मूग, आणि उडीद या पिकांनीही माना टाकल्या असून शेंगांमध्ये दाणे भरण्याआधीच पिके पिवळी पडू लागली आहेत हाता तोंडाशी आलेला घास हिरवल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे शासनाने आता कागदी घोडे न नाचवता जिल्ह्यात तातडीने दुष्काळ घोषित करावा व शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी भरीव भरपाई द्यावी आणि चारा छावण्याची तयारी सुरू करावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने होत आहे २८ प्रकल्प कोरडे टाक १५.५९% साठा शिल्लक पिकाची तर वाट लागलीच शिवाय पिण्याचे पाणी व जनावराच्या चाऱ्याचा प्रश्नही भेडसावत आहे जिल्ह्यातील लहान मोठ्या १४६ प्रकल्पांमध्ये केवळ १५.६९% उपयुक्त पाणीसाठा उरला आहे २८ लहान मोठे प्रकल्प कोरडे पडले आहेत ७१ प्रकल्प मृत साठ्याखाली गेले आहेत जिल्ह्याची भाग्यरेषा मानल्या जाणाऱ्या माजलगाव धरणात अवघा २१.१९% उपयुक्त साठा शिल्लक आहे १७ मध्यम प्रकल्पापैकी कडा रोटी तलाव महासांगवी आणि वाघेबाभळगाव ही सहा धरणे पूर्णपणे कोरडी पडली आहेत.

आम्ही घाम गाळून खते बियाणे घालून पेरणी केली पिके ऐन फुलोऱ्यात असताना पावसाने दांडी मारली सोयाबीन वाळून करपू लागली आता उभी पिकदेखील जनावराच्या पुढे टाकण्याची वेळ आली आहे शासनाने तातडीने जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करून मदत द्यावी खाजगी सावकाराकडून कर्ज काढून पेरणी केली होती वाटले होते यंदा पिकेल आणि पोरा बाळाचे पोट भरेल पण पावसाने पूर्ण घात केला तुरीची रोपे वाळून उभी आहेत सरकारने तातडीने दुष्काळ जाहीर करून विमा आणि अनुदान दिलं नाही तर उन्हात रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे

# पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने !

बीड । प्रतिनिधी

एबीपी माझाचे प्रतिनिधी मंदार गोंजारी यांनी सीओईपी (उजएझ) येथील विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया घेतल्याप्रकरणी पुणे पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या निषेधार्थ आज दि.२७ गुरुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.

यावेळी पत्रकारांवरील दडपशाहीचा धिक्कार असो लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरील हल्ला सहन करणार नाही हुकुमशाही चालणार नाही अशा घोषणा देत पत्रकार मंदार गोंजारी यांच्यावरील गुन्हा तातडीने मागे घेण्याची मागणी करण्यात आली. आंदोलकांच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, पोलिस महासंचालक तसेच विशेष पोलिस महानिरीक्षक यांना निवेदन देण्यात आले.




डॉ. गणेश ढवळे यांनी निवेदनात म्हटले आहे की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमादरम्यान सीओईपीच्या विद्यार्थ्यांनी कॉलेजमधील फी आणि शिष्यवृत्तीशी संबंधित गंभीर समस्या पत्रकार मंदार गोंजारी यांच्या माध्यमातून मांडल्या होत्या. विद्यार्थ्यांच्या समस्या आणि त्यांचा आवाज प्रसारमाध्यमांतून समोर आणल्यामुळेच पत्रकारावर कारवाई करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रसिद्धी देणे आणि त्यांची बाजू समाजासमोर मांडणे हा पत्रकारितेचा मूलभूत अधिकार व कर्तव्याचा भाग आहे. त्यामुळे पत्रकार गोंजारी यांच्यावरील कारवाईचा सामाजिक कार्यकर्ते, माहिती अधिकार कार्यकर्ते, शिक्षणप्रेमी तसेच विविध पक्ष-संघटनांच्या प्रतिनिधींनी निषेध केला असून, संबंधित गुन्हा तातडीने मागे घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

या आंदोलनात माहिती अधिकार कार्यकर्ते शेख युनुस, बाळासाहेब मोरे पाटील (प्रदेशाध्यक्ष, शिवशक्ती-भीमशक्ती विचारमंच), माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), सादेक सय्यद (शहराध्यक्ष, आम आदमी पार्टी बीड), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक बीड), हनुमान घोडके, भीमराव कुट , प्राचार्य डी. जी. तांदळे (मार्गदर्शक, मराठवाडा शिक्षक संघ), ज्येष्ठ समाजसेवक डॉ. संजय तांदळे, लेक लाडकी अभियानचे बाजीराव ढाकणे , आण्णासाहेब मतकर (जिल्हाध्यक्ष रासप बीड), शेषेराव वीर ( जिल्हाध्यक्ष प्रबुद्ध रिपाई बीड), प्रविण आनेराव ( जिल्हाध्यक्ष मायक्रो ओबीसी महासंघ बीड), जयसिंगराजे वीर ( गायरान हक्क अभियान बीड) आदी सहभागी झाले होते.

## अध्यात्मातून समाजप्रबोधनाची नवी वाट; ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार'

**आष्टी । प्रतिनिधी**

अध्यात्माला तर्कशक्तीची जोड देत समाजप्रबोधन, पर्यावरण संवर्धन आणि नैराश्यग्रस्तांना सकारात्मक जीवनदृष्टी देण्यासाठी सातत्याने कार्य करणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली. मराठा सेवा संघ प्रणित तानुबाई बिरजे पत्रकार परिषद, आष्टी यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना प्रतिष्ठेचा 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार-२०२६' प्रदान करून गौरविण्यात आले.

आष्टी येथील राजमाता जिजाऊ विद्यार्थी वसतिगृहात झालेल्या या पुरस्कार सोहळ्यास माजी कुलगुरू मा. सर्जेराव निमसे, उद्योजक व वक्ते मा. एन. बी. धुमाळ, मा. जे. आर.



पवार यांच्यासह पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना शाल, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

अध्यात्मासोबत विवेकाची मशाल

ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांनी अध्यात्माच्या माध्यमातून केवळ धार्मिक विचार मांडण्याऐवजी विवेक, तर्कशक्ती, सामाजिक जाणीव आणि सकारात्मक विचारांची रुजवणूक करण्यावर भर दिला आहे. समाजातील अंधश्रद्धा व नकारात्मक विचारांना छेद देत वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश ते सातत्याने देत आहेत.

विशेषतः नैराश्यग्रस्त व्यक्तींना मानसिक आधार देऊन त्यांच्यामध्ये जगण्याची उमेद आणि सकारात्मक जीवनदृष्टी निर्माण करण्याचे कार्य त्यांच्या सामाजिक कार्याची वेगळी ओळख ठरली आहे. पर्यावरण जनजागृतीच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचा संदेश देत समाजात विधायक परिवर्तन घडवून आणण्याचा त्यांचा प्रयत्न उल्लेखनीय आहे.

कार्याची राज्यभर दखल; पुरस्कारांची मानाची शृंखला

अध्यात्म, समाजप्रबोधन, पर्यावरण जनजागृती आणि सामाजिक कार्यातील योगदानाची दखल घेत ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना यापूर्वी 'समाजरत्न', 'समाजभूषण', 'लोकरत्न' आणि 'महाराष्ट्र भूषण' यांसारख्या विविध प्रतिष्ठेच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यात आता 'जिजाऊ माँसाहेब आदर्श पुरस्कार-२०२६' या सन्मानाची भर पडली आहे. अध्यात्म, विवेक आणि समाजहित यांचा सुरेख संगम साधत समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांच्या कार्याचा झालेला हा सन्मान त्यांच्या सामाजिक योगदानाला मिळालेली कौतुकाची पावती ठरली आहे.

## पान ६ वरुन...

### महसूल प्रशासनाच्या चिरीमिरीने

त्यांच्या मालकीची नोंद का झाली नाही?आणि वारसांची नावे कशाच्या आधारे ७/१२ वर आली? या प्रश्नांची उत्तरे तहसील प्रशासनाने द्यावीत,अशी मागणी सलीम बापू यांनी केली आहे.

त्याचप्रमाणे संबंधित जमिनीची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी,हमालांच्या नावांची ७/१२ वर नोंद घ्यावी, कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करावेत आणि गट नं.२५ संदर्भात कोणतेही खरेदीखत होऊ नये, यासाठी दुय्यम निबंधकांना आदेश द्यावेत,अशी मागणी करण्यात आली आहे.गरीब हमालांच्या हक्काचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून महसूल प्रशासन नेमके कोणाची बाजू घेत आहे?असा संतप्त सवाल उपस्थित करत प्रशासनाने निवेदनाची दखल घेऊन कागदपत्रांची निष्पक्ष चौकशी न केल्यास १ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण करण्याचा इशारा सय्यद सलीमबापू यांनी दिला आहे.

### ना. पंकजाताई मुंडे यांच्या

ॲड.नागेश तांबारे, पियुष सवई (बीड), विवेक पाखरे, संभाजी झांबरे (आष्टी), सुरज घुले (केज), रणजित रुपनर (धारुर), भिष्माचार्य दाभाडे (गेवराई), शहाजी सोळंके (माजलगाव), विनोद बांगर (पाटोदा), कोषाध्यक्ष - केशव बडे (बीड), सचिव - गोविंद मुंडे (परळी), मनोज कोरडे (माजलगाव), भुषण पवार, सुशिल जाधव, आनंद राऊत (बीड), माऊली पानसंबळ, सचिन वारे, आशिष जायभाये (शिरुर), मनोज गुंड, करण काळे (गेवराई), वैजनाथ देशमुख (केज), गणेश बडे (धारुर), महादेव लटपटे, शंभुराज महारनोर (आष्टी), सय्यद अन्सार (अंबाजोगाई), सदस्य - इश्वर भांगे, सुनिल चादर, श्यामसुदर पाटील (गेवराई), सुधीर सोनवणे (पाटोदा), अमोल वाघमारे, सुधाकर मुळे (बीड), तुकाराम हंडे (माजलगाव), रुपेश लगड, बाळासाहेब तिडके (धारुर), संतोष गडदे (अंबाजोगाई)

### दत्तधाम येथील

जाऊन श्रीदत्त प्रभूंचे दर्शन घेतले. मंदिर परिसराची पाहणी करताना लोकसहभागातून करण्यात आलेल्या मंदिर उभारणीची माहिती त्यांनी जाणून घेतली. लोकसहभागातून धार्मिक स्थळाचा विकास करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे क्षीरसागर यांनी यावेळी सांगितले. नागरिक आणि भाविकांच्या सहभागातून उभारलेले हे मंदिर परिसराच्या धार्मिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्व वाढविणारे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी मंदिर परिसरातील व्यवस्था, भाविकांसाठी उपलब्ध सुविधा आणि सुरू असलेल्या कामांचीही पाहणी करण्यात आली. भेटीदरम्यान उपस्थित भाविक व नागरिकांशी त्यांनी संवाद साधला.

### वाहतुकीचा मार्ग मोकळा

रस्त्याच्या कडेला बसल्याने अनेकदा वाहतुकीची कोंडी होण्याची तसेच पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालावे लागण्याची परिस्थिती निर्माण होते. या पार्श्वभूमीवर जिल्हा वाहतूक शाखेने विक्रेत्यांना रस्त्याच्या वापरावर अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीने व्यवसाय करण्याच्या सूचना दिल्या. वाहतुकीला तसेच पायी चालणाऱ्या नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, याची विक्रेत्यांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. नागरिकांची सुरक्षितता, वाहतुकीची शिस्त आणि रस्त्यावरील सुरळीत वाहतूक कायम राहावी, यासाठी विक्रेत्यांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले. दरम्यान, विक्रेत्यांनी रस्त्याचा मुख्य भाग व्यापू नये तसेच ग्राहकांची गर्दी रस्त्यावर होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही पोलिसांनी दिल्या. या कारवाईमुळे भाजी मंडई परिसरातील वाहतुकीचा मार्ग अधिक मोकळा झाला असून, पादचाऱ्यांनाही सुरक्षितपणे ये-जा करण्यास मदत होणार आहे.

### श्री गहिनीनाथ समाधी स्थळाचा

राज्यभरातून हजारो भाविक येतात. मात्र, गडावर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वाहन पार्किंग आणि विश्रामधाम यांसारख्या साध्या मूलभूत सुविधाही उपलब्ध नाहीत. सोयीसुविधांचा मोठा अभाव असल्यामुळे दूरवरून येणाऱ्या महिला, वृद्ध आणि लहान मुलांची प्रचंड गैरसोय होत आहे.

भाविकांमध्ये तीव्र नाराजी आणि विकासाची मागणी

गहिनीनाथांच्या या मूळ समाधी स्थळाचा विकास व्हावा, यासाठी परिसरातील नागरिक आणि भाविक अनेक दिवसांपासून मागणी करत आहेत. प्रशासनाचे या पवित्र स्थानाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. जर या गडाचा विकास केला, तर धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळू शकते.

शासन आणि लोकप्रतिनिधींनी लक्ष घालण्याची गरज

पाटोदा तालुक्याच्या हद्दीतील या ऐतिहासिक व आध्यात्मिक स्थानाचा विकास करण्यासाठी आता शासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने लक्ष घालण्याची नितांत गरज आहे. भाविकांची होणारी परवड थांबवून, गडावर योग्य सुविधा निर्माण केल्यास हे स्थान एक प्रमुख धार्मिक व पर्यटनाचे केंद्र म्हणून नावारूपास येईल, अशी तीव्र इच्छा समस्त भाविक भक्तांकडून व्यक्त केली जात आहे.

### शालेय व्यवस्थापन समितीच्या

वातावरण तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर देण्यात येणार आहे. शाळेच्या विकासासाठी पालक, शिक्षक, ग्रामस्थ आणि शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य यांना विश्वासात घेऊन काम करण्यात येईल, अशी भूमिका श्रीमंत विठ्ठल मुंडे यांनी व्यक्त केली. त्यांची अध्यक्षपदी निवड होताच ग्रामस्थ, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि मित्रपरिवाराकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली चिखलबीड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, शालेय व्यवस्थापन समितीची ही निवड केवळ शाळेच्या विकासापुरती मर्यादित न राहता चिखलबीडमधील आगामी स्थानिक राजकीय समीकरणांवरही परिणाम करणारी ठरणार का, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत-राम जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

शासन विविध योजना या आपल्या राज्यातील जनतेच्या हितासाठी राबवत असते, त्यामधील जे लोक पात्र आहेत असे पात्र लोक या योजनेसाठी प्रशासनाकडे गेले पाहिजेत, सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शासनाने ज्या योजना राबवण्याचे ठरवले आहे त्या योजना जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत म्हणून शासन प्रशासन आणि सर्वसामान्य जागरूक नागरिक यांनी जनहिताच्या योजना लोकांपर्यंत थपोहोचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे,असे मत शिवसेना नेते राम जगताप यांनी व्यक्त केले, ते शिवसेना आपल्या दारी या कार्यक्रमात बोलत होते, यावेळी तहसीलदार संतोष रूईकर, तालुकाप्रमुख तुकाराम यवले, सतीश सोळंके, अविनाशगोंडे,धोंडीराम जाधव,पापा सोळंके, अभिजीत कोंबडे, संजीवनी राऊत,महेमुद शेख, राजेश




विघ्ने,गौतम त्रिभुवन, सुधाकर कुटे,अर्जुन पांढरपोटे, धर्येशील सोळंके,ऋषी गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

माजलगाव तालुक्यातील मोठीवाडी येथील ग्राम पंचायतीच्या प्रांगणात शिवसेना आपल्या दारी हा समाज हिताचा कार्यक्रम आनंद दिघे यांच्या पुण्यतिथी निमित्त दि.२६ ऑगस्ट बुधवार रोजी आयोजक राम जगताप यांच्या संकल्प नेतुन घेण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार संतोष रूईकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.तहसिलदार संतोष रुईकर यांनी सरकारी योजना संदर्भात नागरिकांना मोलाचे मार्गदर्शन केले. उपस्थित सर्व मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणेश पास्टे, माऊली नावडकर, सुरेश पास्टे,अमोल पाष्टे, दादा पास्टे, प्रकाश शेळके गणेश सर्जे, विनोद नावडकर किरण खेत्री यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक राम जगताप यांनी केले व कार्यक्रमाचे आभार अविनाश गोंडे यांनी मानले.

## माजलगावात रसिक मंडळाचा स्वर-सोहळा; दिग्गजांची मैफिल

**माजलगाव । प्रतिनिधी**

गेल्या ३९ वर्षांपासून माजलगावचा सांस्कृतिक चेहरा म्हणून ओळख असलेल्या रसिक मंडळाच्या वतीने यंदाही प्रतिष्ठेच्या मराठवाडा स्तरीय सुगम-नाट्यगीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाची स्पर्धा १३ सप्टेंबर रोजी होणार असून, त्यापूर्वी १२ सप्टेंबर रोजी उदयोन्मुख आणि दिग्गज कलाकारांच्या सुरेल मैफिलीने या सांस्कृतिक उत्सवाची सुरुवात होणार आहे.

रसिक मंडळाची ही वाटचाल कलावंत, शुभेच्छुक आणि रसिकांच्या राजाश्रयामुळेच यशस्वी झाली आहे.सुरुवातीच्या काळात स्थानिक कलावंतांच्या कला सादरीकरणापासून सुरुवात करून मंडळाने अनेक दिग्गजांच्या मैफिली आयोजित केल्या. गेल्या २२ वर्षांपासून अभिजात संगीताचे जतन आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने मंडळ नाट्यगीत गायन स्पर्धा घेत आहे. गेल्या ११ वर्षांपासून या स्पर्धेला अधिक व्यापक रूप देत तिचे सुगम-नाट्यगीत गायन स्पर्धा असे नामकरण करण्यात आले आहे.स्पर्धेचे स्वरूप आणि नियम ही स्पर्धा केवळ मराठवाड्यातील रहिवाशांसाठी खुली असेल. स्पर्धेसाठी दोन गट असतील - लहान गट १६ वर्षांखालील आणि मोठा गट १६ वर्षांवरील.प्रत्येक स्पर्धकाला दोन गीते सादर करावी लागतील - एक नाट्यगीत आणि एक सुगम संगीत. दोन्ही गीते एकत्रित ७ मिनिटांत सादर करावी लागतील आणि त्यांचा क्रम मंडळ ठरवेल. स्पर्धेची एकच फेरी असेल. परगावाहून येणाऱ्या स्पर्धकांची निवासाची व्यवस्था करण्यात येईल. बक्षिसांची रक्कम रोख स्वरूपात दिली जाणार असून, बक्षीस वितरण समारंभाला उपस्थित राहणे स्पर्धकांसाठी बंधनकारक आहे. वाद्य व वादकांची व्यवस्था मंडळातर्फे करण्यात येईल, मात्र स्पर्धकांना स्वतःचे वाद्य व साथीदार आणण्यास मुभा आहे. तानपुऱ्याव्यतिरिक्त इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक वाद्य वापरता येणार नाही. स्पर्धेचे प्रवेश शुल्क १५० रुपये ठेवण्यात आले आहे.जास्तीत जास्त स्पर्धकांनी या मराठवाडा स्तरीय स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष आर डी भिलेगावकर आणि संपूर्ण रसिक मंडळ यांनी केले आहे.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बीडमध्ये उभारल्या राष्ट्रीय दर्जाच्या सोयी-सुविधा

## आदित्य कृषी महाविद्यालयात विद्यार्थी विकास, क्रीडा व शैक्षणिक सुविधा; विद्यापीठाकडून शिक्षण संस्थेचा गौरव

बीड । प्रतिनिधी

अमृतकाळातील विकसित भारताच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी विद्यार्थ्यांनी उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक व व्यावसायिक संधींचा पुरेपूर लाभ घेऊन स्वतःचा सर्वांगीण विकास साधावा. शिक्षणासोबतच शेतकरी, ग्रामीण समाज आणि उद्योजकतेशी नाते जोडून भविष्यात सक्षम व जबाबदार नागरिक म्हणून पुढे यावे, असे आवाहन विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. राजेश कदम यांनी केले.

आदित्य शिक्षण संस्था बीड संचलित व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नित आदित्य कृषी महाविद्यालय, बीड येथे विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी तथा रावे कार्यक्रमाचे विद्यापीठ समन्वयक डॉ. राजेश कदम यांनी भेट देऊन महाविद्यालयातील विविध शैक्षणिक, क्रीडा व विद्यार्थी विकासाच्या सुविधांची पाहणी केली. यावेळी विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. संघर्ष शृंगारपुरे उपस्थित होते.

डॉ. कदम यांनी महाविद्यालयाच्या परिसरातील विविध विभाग, क्रीडांगणे, हिरवाईने नटलेला ग्रीन कॅम्पस, विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा तसेच संस्थेच्या वतीने उभारण्यात आलेल्या आधुनिक मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स (टर्फ) ची पाहणी केली. कृषी महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये अशा अत्याधुनिक पद्धतीचे मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स उभारण्यात आल्याबद्दल त्यांनी आदित्य शिक्षण संस्था व महाविद्यालयाचे विद्यापीठाच्या वतीने अभिनंदन केले.

यावेळी डॉ. राजेश कदम हे विद्यापीठाचे रावे कार्यक्रमाचे समन्वयक असल्याने त्यांनी महाविद्यालयातील रावेच्या विद्यार्थ्यांशी हितगुज केले. विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये जाऊन केलेल्या कृषीविषयक, सामाजिक व जनजागृतीपर कामांची त्यांनी माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध रील्स व उपक्रमांचे त्यांनी




प्रत्यक्ष अवलोकन करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांच्या कामात आणखी नावीन्य आणण्याबाबत मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळविण्यापुरते शिक्षण न घेता शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष अडचणी समजून घेऊन विद्यापीठ व शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करावे, असे डॉ. कदम यांनी सांगितले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतः शेतकरी, कृषी व्यावसायिक तसेच भविष्यात यशस्वी उद्योजक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, कौशल्यविकास व सकारात्मक दृष्टिकोन जोपासावा,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी विद्यापीठाचे क्रीडा अधिकारी डॉ. संघर्ष शृंगारपुरे यांनी आदित्य कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी विद्यापीठाच्या विविध संघांमध्ये केलेला सहभाग तसेच विविध क्रीडा स्पर्धांमध्ये मिळविलेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.महाविद्यालयाच्या परिसरातील बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस तसेच मल्टीस्पोर्ट कॉम्प्लेक्स यांसारख्या सुविधांची पाहणी करून त्यांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांनी महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची माहिती दिली.

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थ्यांना अत्याधुनिक शैक्षणिक, क्रीडा व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असल्याची माहिती प्राचार्य भुतडा यांनी दिली. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. रामप्रसाद मोरे, रावे कार्यक्रम अधिकारी डॉ.डी.बी.सातपुते, राष्ट्रीय सेवा योजना गटप्रमुख डॉ.पी.डी.खेडकर, तसेच डॉ. वीरेंद्र कुमार, डॉ. एन.यू. ठोके, प्रा. व्हि.एस मिसाळ,प्रा.एस.जी.बोरडकर, प्रा.ओ.एन.राऊत, प्रा. धावणे, यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. प्रस्ताविक डॉ. डी. बी. सातपुते यांनी तर आभार डॉ. रामप्रसाद मोरे यांनी मानले.

cmyk

राज्य लोकतंत्र

# शेत-शिवार

शुक्रवार दि.२८ ऑगस्ट २०२६



# वाळणाऱ्या खरीप पिकांना तुषार सिंचनाचा मिळतोय आधार

## आठ दिवसांत पाऊस न आल्यास खरीप उध्वस्त होण्याची भीती, शेतकऱ्यांच्या नजरा आभाळाकडे



भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाईसह परिसरात पावसाअभावी खरीप हंगाम डोळ्यांदेखत कोमेजत आहे. शिवाराशिवारात काळ्याकुट्ट ढगांकडे डोळे लावून बसलेला बळीराजा दिसतो. शेतात हिरवीगार पिके सुकत आहेत. मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारली. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ आली. पिके वाचवण्यासाठी तुषार, ठिबक सिंचनावर शेवटची धडपड सुरू आहे. हंगामाच्या सुरुवातीपासूनच निसर्गाने परीक्षा घेतली. पावसाळ्याचे दोन महिने उलटले. समाधानकारक पाऊस झाला नाही.

जो पाऊस झाला, तो तुटपुंजा ठरला. नदी, नाले, ओढे कोरडेठाक आहेत. भूजल पातळीत वाढ नाही. विहिरींनी ऑगस्टमध्येच तळ गाठला. शिवारात सोयाबीन, मका, कपाशी, तूर ही पिके उन्हाच्या तडाख्याने कोमेजली आहेत. पाण्यासाठी पिकांची तडफड सुरू आहे. विहिरीत किंवा कूपनलिकेत जेमतेम पाणी असलेल्या शेतकऱ्यांनी रात्रीचा दिवस केला. तुषार संच जोडले. पाण्याचा तुषार उडवून पिकांना थोडी नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न सुरू आहे. विहिरीतील पाणी किती दिवस पुरणार, हा प्रश्न उभा आहे. सिंचनाची सोय नसलेल्या अल्पभूधारकांची स्थिती अधिक विदारक आहे. पाण्याचा आधार नाही.

हे शेतकरी आकाशाकडेच पाहत आहेत. रोज सकाळी ढग जमा होण्याची वाट पाहिली जाते. येत्या चार ते आठ दिवसांत दमदार पाऊस झाला नाही, तर संपूर्ण खरीप हंगाम हातातून जाईल, अशी भीती व्यक्त होत आहे. वर्षभराची मेहनत मातीमोल होईल. पिकांचे नुकसान होईल. कर्जाचा डोंगर वाढेल. बियाणे, खते, मशागतीचा खर्च कसा वसूल करायचा, ही चिंता वाढली आहे. ग्रामीण भागात सध्या पावसाचीच चर्चा आहे. पाऊस गायब राहिल्यास शेतीबरोबर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. जनावरांच्या चाऱ्याचाही गंभीर प्रश्न उभा राहू शकतो. पावसाने दगा दिल्यास अर्थचक्र ठप्प होईल, ही भीती प्रत्येक शेतकऱ्याला सतावत आहे. स्थानिक व्यापाऱ्यांवरही मंदीचे सावट पसरलेले शेतात पिके फुलली की त्याचा थेट परिणाम स्थानिक बाजारपेठेवर दिसून येतो. परंतु, यंदा खरीप हंगाम धोक्यात आल्याने पिंपळगाव रेणुकाईसह संपूर्ण भोकरदन तालुक्यातील बाजारपेठेतील उत्साह मावळला आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा आला तरच बाजारपेठेत उलाढाल होते. मात्र, आता पिकेच वाळू लागल्याने आगामी सण-उत्सवांच्या काळात बाजारपेठेत शंभर टक्के मंदीचे सावट राहण्याची भीती स्थानिक व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्याचे व्यवस्थापन



पावसाळ्यात जनावरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणगरजेचे असते, कारण या काळात जनावरांना जंतूसंसर्ग किंवा पोषणा अभावी विविध प्रकारचे आजार होत असतात. वेळीच उपाय केल्यास होणारे नुकसान टाळता येते. यात प्रामुख्याने शेळ्या, मेंढ्याची निगा राखणे महत्त्वाचे ठरते.

पावसाळ्यातील शेळ्यांचे व्यवस्थापन : शरीरावरील परजीवींच्या वाढीकडे लक्ष द्यावे. नवीन करडांचे जंत निर्मूलन करावे. सर्व शेळ्यांचे आंत्रविषार, पी. पी. आर., धनुर्वातासाठी लसीकरण करून घ्यावे.

पैदासक्षम शेळ्यांना खुराक वाढवा. पैदाशीच्या बोकडांची पैदाशीसाठी तयारी करावी. जर एकावेळी शेळ्यांना गाभण घालायचे असेल तर माज ओळखण्यासाठी माज ओळखणारा बोकड गोठ्यात ठेवावा.

पावसाळ्यातील मेंढ्यांचे व्यवस्थापन : पशु वैद्यकाच्या सल्ल्याने कळपातील मेंढ्यांची लाल लघवीचा आजार व कावीळ या रोगाची तपासणी करून उपचार करावे. मेंढ्यांना शिफारसीनुसार जंताचे औषध उपचार करावेत. गाभण मेंढ्याची विशेष काळजी घ्यावी. १ ते १२ महिने वयाच्या कोकरांचे शारीरिक वजन करून घ्यावे. सर्व मेंढ्यांना धनुर्वात रोगाचे लसीकरण करून घ्यावे.

इतर जनावरांची काळजी : गोठ्यामध्ये काही ठिकाणी पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनियम मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे.

पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते. दगड व माती खूरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खूरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो. हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथी घास यासारखी पिके घ्यावीत.

# पपई लागवडीसाठी या तीन जाती ठरतील उपयुक्त

आपण एकंदरीत भारताचा विचार केला तर पपईची लागवड आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, तामिळनाडू, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम, पश्चिम बंगाल व बिहार इत्यादी राज्यांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर होते. आणि फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र मध्ये नाशिक, अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, पुणे, सातारा, जालना, सोलापूर या व इतर अनेक जिल्ह्यांमध्ये पपईची लागवड केली जाते.

पपईच्या भरघोस उत्पादन देणाऱ्या जाती :

पुसा डेलिशियस - या जातीचे पपईचे झाड जास्तीत जास्त सात ते साडेसात फूट उंच वाढते व लागवडीपासून ८ महिन्यात फळे लागतात. या जातीच्या एका झाडावर नर आणि मादी असे दोन्ही प्रकारचे फुले असतात. या जातीचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या जातीला जमिनीपासून अवघ्या अडीच ते पावणेतीन फुटांवर फळे लागायला सुरुवात होते. या जातीच्या फळांची प्रत उत्कृष्ट असल्यामुळे बाजारपेठेत भाव देखील चांगले मिळतात. या जातीच्या फळांचा आतील गर नारिंगी असतो व चव व स्वाद उत्तम असतो. फळांचा आकार मध्यम व मोठा तसेच गोलाकार लांबोळी असतात. एका फळाचे वजन एक ते दोन किलोपर्यंत भरते.

पुसा मॅजेस्टी - या जातीचे झाडे सहा ते साडे सहा फूटपर्यंत वाढते. या जातीच्या रोपांची लागवड केल्यापासून पाच महिन्यात जमिनीपासून दीड फूटावरून फळधारणा व्हायला सुरुवात होते. या जातीची फळे मध्यम, आकाराने गोलाकार तसेच गर हा घट्ट पिवळसर असतो. साडेतीन सेंटीमीटर जाडीचा गर या जातीच्या फळाचा असून फळे एक किलो पासून तीन किलो पर्यंत असतात. या जातीच्या फळांमध्ये टिकाऊपणा जास्त असल्यामुळे साठवणुकीत फळे खराब होण्याचे प्रमाण नगण्य असते.

पुसा जायंन्ट - या जातीच्या पपईचे झाडे सात ते साडेसात फूट उंच वाढते व लागवड केल्यापासून साडेआठ महिन्यानंतर जमिनीपासून तीन फुटांवर फळे लागायला सुरुवात होतात. या जातीच्या पपईच्या झाडाचे खोड मजबूत असल्यामुळे वाऱ्यामध्ये झाड पडत नाही. या जातीची फळे आकर्षक व मोठी असतात तसेच एका फळाचे वजन सव्वा ते तीन किलो वजना पर्यंत भरते. या जातीच्या फळांचा उपयोग भाजी व फॅनिंगसाठी केला जातो.या जातीच्या फळांचा गर नारिंगी रंगाचा असतो व जाडी ५ सेंटिमीटर असते.



# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४५ : 'सायंटिफिक अमेरिकन' मासिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९०४ : कलकत्ता ते बैरकपुर शहरादरम्यान पहिल्या कार रॅलीचे आयोजन करण्यात आलं होत.
१९१६ : पहिले महायुद्ध जर्मनीने रोमानियाविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१६ : पहिले महायुद्ध इटालीने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९३१ : फ्रान्स आणि सोविएत युनियनने शस्त्रसंधी करार केला.
१९३७ : 'टोयोटा मोटर्स' ही स्वतंत्र कंपनी बनली. जपानची जपानी बहुराष्ट्रीय ऑटोमोटिव्ह निर्मिती कंपनी 'टोयोटा मोटर्स' ची स्थापना करण्यात आली.
१९८६ : भाग्यश्री साठे बुद्धिबळ ग्रँडमॅस्टर बनणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.
१९९० : इराकने कुवेत हा आपलाच एक प्रांत असल्याचे जाहीर केले.
१९९२ : श्रीलंकन क्रिकेटपटू व फिरकी गोलंदाज मुथया मुरलीधरन यांनी ऑस्ट्रेलिया विरुद्ध कसोटी सामन्यात पदार्पण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४९ : योहान वूल्फगाँग गटें जर्मन महाकवी, लेखक, कलाकार आणि राजकारणी (मृत्यू: २२ मार्च १८३२)
१८९६ : रघुपती सहाय ऊर्फ फिराक गोरखपुरी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू शायर ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ऊर्दू शायर (मृत्यू: ३ मार्च १९८२)
१९०६ : नटवर्य चिंतामणी गोविंद तथा 'मामा' पेंडसे (मृत्यू: १९९१)
१९०८ : विनायक माधव तथा 'विमादी' पटवर्धन दीक्षित विनोदकार (मृत्यू:)
१९१३ : भोपाल रियासतेच्या राजकुमारी व भारतातील पहिल्या महिला वैमानिक आबिदा सुल्तान यांचा जन्मदिन.
१९१८ : राम कदम मराठी चित्रपट प्रसिद्ध संगीतकार (मृत्यू: १९ फेब्रुवारी १९९७)
१९२६ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित माजी पोलिस सेवा अधिकारी, गुप्तचर विभाग प्रमुख तसचं, सिक्किम, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल टी. व्ही. राजेश्वर यांचा जन्मदिन.
१९२८ : उस्ताद विलायत खाँ सुप्रसिद्ध सतारवादक (मृत्यू: १३ मार्च २००४)
१९२८ : भारतीय पदार्थवैज्ञानिक एम. जी. के. मेनन यांचा जन्म.
१९२९ : प्रख्यात भारतीय हिंदी भाषिक लेखक, कथाकार, उपन्यासकार आणि आलोचक राजेंद्र यादव यांचा जन्मदिन.
१९३४ : सुजाता मनोहर सर्वोच्च न्यायालयातील न्यायमूर्ती आणि राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षा
१९३८ : कॅनडाचे पंतप्रधान पॉल मार्टिन यांचा जन्म.
१९५४ : भारतीय-इंग्लिश अर्थशास्त्री रवी कंबुर यांचा जन्म.
१९६५ : पोकेमोन चे निर्माते सातोशी ताजीरी यांचा जन्म.
१९६६ : प्रिया दत्त लोकसभा खासदार?

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६७ : मिर्झा राजे जयसिंग (जन्म: १५ जुलै १६११) जयपूर चे राजे
१९६९ : भारतीय स्वातंत्र्यसैनिक, विचारवंत रावसाहेब पटवर्धन यांचे निधन.
१९७२ : भारतीय नागरी सेवक आणि प्रशासक तसचं, भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे सदस्य एन. माधवराव यांचे निधन.
१९८० : लोकप्रिय बंगाली लेखक, विनोदी व लघुकथाकार व क्रांतिकारक शिब्राम चक्रवर्ती यांचे निधन.
१९८४ : इजिप्तचे पहिले राष्ट्रपती मुहम्मद नागुब यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९०१)
१९९० : भारतीय चित्रपट अभिनेत्री सुमित्रा देवी यांचे निधन.
२००१ : व्यंकटेश दिगंबर माडगूळकर लेखक, चित्रकार, पटकथाकार, शिकारी (जन्म: ६ जुलै १९२७)

# सीताफळातील एकात्मिक कीड-रोग नियंत्रण

सीताफळ हे कोरडवाहू भागातील महत्त्वाचे फळपीक आहे. सध्या राज्यातील सीताफळ लागवड क्षेत्रात चांगला पाऊस पडत असून, फळधारणेस अनुकूल परिस्थिती आहे. मात्र सततच्या पावसाने बागांमध्ये आर्द्रता टिकून राहत असल्याने रोग व किडींच्या प्रादुर्भावास पोषक वातावरण तयार झाले आहे. सध्या पूर्णपणे उमललेल्या कळ्या व लहान आकाराच्या फळांवर तपकिरी काळपट डाग आढळून येत आहेत. हे डाग नेमक्या कोणत्या कीड किंवा रोगामुळे आहेत, हे जाणून घेऊन त्यानुसार वेळीच योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

थ्रिप्स (फुलकिडी) : फुलकिडीचे प्रौढ आणि पिले आकाराने लहान असून, ते नवीन आलेल्या कळ्या, नुकतीच फलधारणा झालेली फळे, पानाच्या पाठीमागील बाजूची मुख्य शिरा येथील पृष्ठभाग खरवडून बाहेर पडणारा द्रव शोषतात. परिणामी, नुकसान झालेला भाग तपकिरी रंगाचा होतो. कालांतराने तो काळपट पडतो. पाने वेडीवाकडी होतात. मोठ्या फळांवर देखील खरवडल्याचे डाग दिसून येतात. फळ वाढेल तसे खरवडल्याचे डाग वाढत जातात. प्रादुर्भावग्रस्त भाग कठीण होतो. फळांचा आकार वेडावाकडा होतो. परिणामी फळांना बाजारात अपेक्षित दर मिळत नाही.

मावा : मावा किडीचे प्रौढ आणि पिले नवीन आलेल्या कळ्यांमधून रस शोषून घेतात. ही कीड शरीरातून मधासारखा चिकट पदार्थ स्रवते. त्यावर काळी बुरशी वाढते. या किडीचा प्रादुर्भाव वाढल्यास फळधारणेवर विपरीत परिणाम होऊ शकतो.



टी मॉस्किटो बग : 'टी मॉस्किटो बग' या रसशोषक किडीची पिले व प्रौढ सीताफळाच्या झाडांची कोवळी फूट, कळ्यांचा व फुलांचा देठ, कोवळी व पक्क फळे या भागामधून रस शोषून घेतात. ती सोंड घुसवून रस शोषत असल्याने त्या ठिकाणच्या पेशी काळ्या पडून कठीण होतात. तयार झालेल्या ठिपक्यांचा आकार पुढे मोठा होतो. तिथे करपल्यासारखा काळा डाग पडतो. या किडीमुळे होणाऱ्या जखमांमधून फळसड रोगाच्या बुरशीचा प्रवेश होऊन पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेंडेमर, शेंडे करपणे, कळ्या जळणे, फळे देठाजवळ काळी पडणे यासारखी लक्षणे दिसून येतात.

उपाययोजना : ही कीड सीताफळ बागेत सध्या कमी प्रमाणात आढळत असली तरी तिची आर्थिक नुकसान पोहोचविण्याची क्षमता अधिक आहे. त्यामुळे या किडीबाबत सध्या सर्वेक्षण करून वेळीच व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. सीताफळाच्या बागेत स्वच्छता राखावी. नियोजनबद्ध एकात्मिक आणि संतुलित प्रमाणात खत व पाणी व्यवस्थापन करणे. किडीने आर्थिक नुकसानीची पातळी (५ टक्के नुकसानग्रस्त फळे) गाठल्यास किंवा या पेक्षा किडींची संख्या अधिक झाल्यास फवारणी करावी. (प्रमाण : प्रति १० लिटर पाणी) लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ ईसी) ६ मिलि किंवा बायफेन्थ्रीन (८ टक्के एससी) १२.५ मिलि किंवा थायाक्लोप्रिड (२१.७० टक्के एससी) १० मिलि. कीटकनाशकाची फवारणी करण्यापूर्वी काढणी पश्चात कालावधी तपासून फळकाढणीचा निर्णय घ्यावा.

पिठ्या ढेकूण (मिलीबग) : पिठ्या ढेकूण ही कीड पाने, कोवळ्या फांद्या, कळ्या आणि कोवळी फळे यातून रस शोषते. परिणामी, पानांचा, फळांचा आकार वेडावाकडा होतो. झाडांच्या वाढीवर विपरीत परिणाम होतो. नवीन फुटींची व पानांची वाढ खुंटते. फळांची वाढ अयोग्य होऊन आकार वेडावाकडा होतो. या किडीच्या शरीरातून स्रवणाऱ्या मधासारखा चिकट पदार्थावर काळी बुरशी वाढते. परिणामी पाने, फळे काळी पडतात. फळांना बाजारभाव मिळत नाही.

उपाययोजना : पिठ्या ढेकणाची पिले खोडावरून झाडावर चढतात. यासाठी उपाय म्हणून ५ सेंटिमीटर रुंदीची प्लॅस्टिक चिकट पट्टी खोडाला चिकट बाजू वर ठेवून लावावी. त्याला पिले चिकटून मरतात. या किडीच्या पुढील प्रसाराला वेळीच आळा बसतो. परभक्षी मित्रकीटक क्रिप्टोलिमस मॉन्ट्रोझायरी प्रति एकरी ६०० या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने ३ ते ४ वेळा बागेत झाडावर सायंकाळच्या वेळी सोडावेत. भुंगेरे सोडल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या कीटकनाशकाची बागेवर फवारणी करू नये. लेकॅनोसिलिअम लेकानी (व्हर्टिसिलिअम लेकॅनी) हे जैविक बुरशीनाशक ५ ग्रॅम अधिक फिश ऑइल रोझीन सोप ५ ग्रॅम प्रतिलिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. आर्द्रतायुक्त हवामानामध्ये जैविक बुरशीनाशक उत्तम काम करते. त्यामुळे सध्या ही फवारणी फायदेशीर ठरेल.

फळसड : हा रोग कोलेटोट्रीकम ग्लिओस्पोराइडेस या बुरशीमुळे होतो. हा रोग आर्द्रतायुक्त दमट हवामानात अधिक दिसून येतो. मात्र कोरड्या हवामानात रोगाचे प्रमाण कमी असते. फळसड हा रोग फळवाढीच्या कुठल्याही अवस्थेत येऊ शकतो. मात्र कळ्या आणि लहान फळे रोगास जास्त प्रमाणात बळी पडतात. या अवस्थेत रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास कळ्या, लहान फळे आणि त्यांचे देठ काळे होऊन गळून पडतात. फळे मध्यम सुपारीच्या आकाराची (१५ ते २० मि.मी. व्यास) झाल्यावर प्रादुर्भाव झालेली फळे गळून न पडता लटकून राहतात. अशी रोगग्रस्त फळे न पिकता वाळून जातात व कडक होतात. अशाप्रकारे या रोगामुळे जवळजवळ ६० ते ७० टक्के नुकसान होण्याची शक्यता असते.

उपाययोजना : रोग व्यवस्थापनाच्या दृष्टीने बागेत वेळोवेळी नांगरट, जमीन तापू देणे आणि स्वच्छता या बाबी महत्त्वाच्या आहेत. छाटणी करतेवेळी गर्दी होत असलेल्या फांद्यांसोबतच झाडावर शिल्लक राहिलेली रोगग्रस्त फळे, फांद्या, पाने छाटून टाकावीत. छाटणीनंतर सर्व रोगग्रस्त अवशेष गोळा करून जाळून नष्ट करावे. बहराचे पाणी देण्यापूर्वी किंवा पावसाळ्यापूर्वी पाणी देण्यासाठी झाडांभोवती वाफे करून सेंद्रीय व रासायनिक खताचा हप्ता द्यावा. त्यामुळे रोग किडीविरुद्ध झाडाची प्रतिकारशक्ती वाढते. फळे सुपारीच्या आकारापेक्षा मोठी झालेली असल्यास १ टक्का बोर्डो मिश्रणाच्या (१ किलो चुना अधिक १ किलो मोरचूद प्रति १०० लिटर पाणी) किंवा मॅन्कोझेब २० ग्रॅम अधिक कार्बेन्डाझिम १० ग्रॅम (टँक मिक्स) प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने आवश्यकतेनुसार २ ते ३ फवारण्या घ्याव्यात.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# पावसाच्या दीर्घ खंडामुळे पिके करपण्याच्या मार्गावर

## तात्काळ पंचनामे करून पीकविमा व नुकसानभरपाई द्या–नितीन जेथलिया

परतूर

परतूर विधानसभा मतदारसंघात यावर्षी अत्यल्प पाऊस तसेच मागील एक महिन्यापेक्षा अधिक काळ पडलेल्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत असून शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज मा. उपविभागीय अधिकारी, परतूर यांना निवेदन देऊन तात्काळ पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना पीकविमा व शासकीय नुकसानभरपाई देण्याची मागणी करण्यात आली.या मतदारसंघातील परतूर, मंठा तसेच ग्रामीण भागात यावर्षी पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. सुरुवातीला पिकांची उगवण समाधानकारक झाली असली तरी त्यानंतर पावसाने मोठी दडी मारल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. विशेषतः सोयाबीनची पाने वाळत असून झाडांची वाढ खुंटली आहे. शेंगा भरण्याच्या महत्त्वाच्या काळात पाण्याअभावी उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. कापूस पिकाचीही अवस्था चिंताजनक असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या मार्गावर आहेत.



शेतकऱ्यांनी बी–बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी व डिझेलसाठी मोठा खर्च केला असून अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली आहे. वर्षभराच्या मेहनतीनंतर पीक हातात येण्याच्या काळातच पावसाने पाठ फिरवल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा हाता–तोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत गावनिहाय व शेतनिहाय प्रत्यक्ष पाहणी करून तात्काळ पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. पंचनाम्यांमध्ये पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंड, पिकांचे झालेले नुकसान आणि अपेक्षित उत्पादनातील घट यांची वस्तुनिष्ठ नोंद करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली. ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित विमा कंपनी व यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात यावेत. तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले पीकविमा नुकसान संदर्भातील ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच शासनाच्या लागू निकषांनुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती/पीक नुकसानभरपाई तातडीने मंजूर करावी, नुकसानग्रस्त भागात विशेष पथके नियुक्त करावीत, शेती कर्जाबाबत उपलब्ध कर्जसवलत व कर्ज पुनर्गठन योजनांचा लाभ मिळवून द्यावा आणि पीकविमा व नुकसानभरपाईची प्रक्रिया सुलभ व जलद करावी, अशी मागणी करण्यात आली. याशिवाय परतूर विधानसभा मतदारसंघात मंजूर झालेल्या घरकुलांच्या लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यासाठी संबंधित गावांमध्ये ग्रामसभा आयोजित करून पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देण्यात यावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब गाडगे,मंठा तालुकाध्यक्ष दिलीपराव चव्हाण,आशिष भैय्या जेथलिया, इंद्रजित घनवट, हाजी रेहमत, नगरसेवक बाबुराव हिवाळे, राजेश खंडेलवाल, शाकेर खतीब, मंगेश डहाळे,मंजुळदास सोळंके, वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, दत्ता अंभुरे, गणेश ढवळे, विष्णुपंथ तनपुरे,सुरेश जिजा सवणे,बंडु भुबर,रामकिसन रुपनर,शाकेरभाई मापेगावकर,दिपक कळदाते,दत्ता अंभुरे, अनिल आंबेकर, कम्मू पठाण, मोसीन बागवान, दिपक उबाळे, दिपक मुजमुले, सुरेश भंडारी,जनार्धन काळे, योगेश डोणे,कांतराव सोळंके, डॉ. केशरखाने, संकेत अंभुरे, अजीम पठाण, विशाल पवार, रफिक कुरेशी, सोनू धुमाळ,अमेर पठाण,सौरभ अंभुरे, राहुल अंभुरे, एकनाथ बोनगे, विठ्ठल राऊत, शोएब सिद्दीकी, सचिन बोंबले, अमोल अंभुरे, विकास खुळे, अशोक खरात, अंकुश मिठे, श्रीरंग मोगरे,दत्ता लिपने,मयूर लिपने, अंबादास डवले, उद्धव पवार,मुरतूजा कल्याणकर,अजिम कुरेशी, विठ्ठलराव बागल, जगन दवणे, परमेश्वर उबाळे,प्रवीण डुकरे, शुभम कठोरे, राजेभाऊ धुमाळ, मनोज कऱ्हाळे,विष्णु मचाले,राजू कुरेशी,तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचा प्रश्न शासनाच्या स्तरावर तातडीने मांडण्यासाठी सोमवारी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच कृषीमंत्री मा. दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन त्यांना स्वतंत्र निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी दिली. पावसाच्या दीर्घ खंडामुळे निर्माण झालेली परिस्थिती, कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे झालेले नुकसान, तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई तसेच पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी याबाबत शासनस्तरावर तातडीने निर्णय घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे नितिन जेथलिया यांनी सांगितले. ''परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना या संकटाच्या काळात शासनाकडून तातडीची मदत मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी शासनस्तरावर ठोस पाठपुरावा करून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहोत,'' असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना योग्य ती आर्थिक मदत, पीकविमा नुकसानभरपाई व आवश्यक शासकीय मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

# टोमॅटोचे दर घसरल्याने करमाड येथे शेतकऱ्यांचा ३० मिनिटे रास्ता रोको

## जालना महामार्गावर वाहतूक कोंडी, बाजार समितीत १७ हजार क्रेट आवक



करमाड। प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर उपबाजार समितीच्या करमाड बाजारात टोमॅटोच्या दरात अचानक घसरण झाल्याने बुधवारी शेतकऱ्यांचा संताप उफाळून आला. मंगळवारी १० ते १७ रुपये किलो असलेला दर बुधवारी थेट ८ ते १३ रुपयांवर आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी कालचा दर आजही मिळालाच पाहिजे अशी मागणी करत जालना महामार्गावर ३० मिनिटे रास्ता रोको आंदोलन केले. यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. बुधवारी बाजारात टोमॅटोची तब्बल १७ हजार क्रेटची प्रचंड आवक झाली. बियाणे, खते, मजुरी आणि वाहतुकीचा वाढता खर्च पाहता मिळालेला दर तुटपुंजा असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची खंत शेतकऱ्यांनी व्यक्त केली. एकाच दिवसात झालेल्या या दरघसरणीच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले. सभापती श्रीरामबाबा शेळके यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांची बाजू समजून घेतली. व्यापाऱ्यांना पारदर्शक व्यवहार करण्याचे निर्देश दिले. सभापतींच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे घेतले. दरनिश्चितीसाठी विश्वासात घेण्याची भूमिका शेतकऱ्यांनी यावेळी मांडली. करमाड येथील जालना महामार्गावर शेतकऱ्यांनी रास्ता रोको केला.

**जाहीर प्रगटन**

**ॲड. एम. आर. उबाळे मा. श्रीमती वंदना व्ही. जोशी, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. ६०३/२०२६**

**संगिता भ्र.शिवाजी कानधरे व इतर वि. निरंक**

अर्जदार : १. संगिता भ्र. शिवाजी कानधरे, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कुर्ला ता.जि.बीड २. हनुमान पि. शिवाजी कानधरे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ३. अश्विनी भ्र. शरद घोडके, वय ३२ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोळदगांव ता.जि.बीड

विरुध्द गैरअर्जदार निरंक

प्रकरणः– भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे हे दिनांक १५/०८/२०२५ रोजी शिवकमल हॉस्पीटल, बीड ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. तसेच अर्जदार क. ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. मयतास अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे शिवाजी पि. विश्वनाथ कानधरे रा. कुर्ला ता.जि.बीड यांचे अर्जदार हे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील तारीख १६/०६/२०२६. पु. ता. ०१/१०/२०२६ आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन,

स्वाक्षरित/–
कनिष्ठ लिपीक

स्वाक्षरित/–
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# कार्यशाळेत ६०० विद्यार्थ्यांनी बनवल्या शाडू मातीच्या पर्यावरणपूर्वक गणेशमूर्ती

## शालेय विद्यार्थ्यांनी शाडू मातीच्या मूर्तींची घरी स्थापना करावी

अहिल्यानगर। प्रतिनिधी

यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्यासाठी नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी शाडू मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करावा, असे आवाहन महापौर ज्योती गाडे व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे. याचबरोबर, महानगरपालिकेच्यावतीन आयोजित करण्यात येणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेत यंदा प्रथमच गड व किल्ल्यांवर आधारित ऐतिहासिक देखाव्यांचा समावेश करण्यात आला असून यासाठी विशेष पारितोषिके दिली जाणार आहेत.



अहिल्यानगर महानगरपालिका आणि रेसिडेन्सी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांसाठी शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनविण्याची कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत विद्यालयातील सहाशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेत श्री गणेशाच्या विविध रूपांतील सुंदर मूर्ती साकारल्या. महापौर गाडे म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी नवीन मूर्ती विकत न घेता आपल्या हाताने बनविलेल्या शाडू मातीच्या मूर्तींचीच घरी पारंपरिक पद्धतीने स्थापना करावी. आयुक्त यशवंत डांगे यांनी जलप्रदूषण टाळण्यासाठी शाडू मातीच्या मूर्तींचा वापर वाढविण्यावर भर दिला. दुसरीकडे गणेशोत्सवानिमित्त महानगरपालिकेच्यावतीने यंदाही सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात गणेश मंडळ अध्यक्ष आणि प्रमुखांची एक समन्वय बैठक १ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता मनपा मुख्य कार्यालयात आयोजित करण्यात आली असून सर्व मंडळांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयुक्तांनी केले आहे. देखावा स्पर्धेत समाजप्रबोधन, ऐतिहासिक, धार्मिक आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित जिवंत देखावे सादर करता येणार आहेत. महानगरपालिकेने यंदाच्या गणेशोत्सव देखावा स्पर्धेत गड–किल्ल्यांचा नव्याने केलेला समावेश हा केवळ एका स्पर्धेचा भाग नसून राज्याच्या वैभवशाली इतिहासाचे जतन करण्याच्या प्रगल्भ दृष्टिकोनाचा परिपाक आहे. गणेशोत्सवासारख्या सर्वांत मोठ्या सार्वजनिक व्यासपीठाचा वापर केवळ देखाव्यांसाठी न करता तरुण पिढीला आपल्या ऐतिहासिक मुळांशी जोडण्यासाठी करणे हा यामागचा उद्देश आहे. पारंपरिक गणेशोत्सवाचा मूळ गाभा टिकवून ठेवत त्याला छत्रपती शिवाजी महाराजांच्या गौरवशाली इतिहासाची जोड देण्याचा प्रशासनाचा हा प्रयत्न असून, यातून गणेश मंडळांना ऐतिहासिक वारसा जपण्यासाठी प्रोत्साहन मिळाले आहे.

# महालिंगराय वाडीमध्ये महिला गट शेतीच्या माध्यमातून उभारला सक्षमीकरणाचा आदर्श

उमरगा । प्रतिनिधी

तालुक्यातील महालिंगराय वाडी (जि. धाराशिव) येथील ग्रामीण भागातील महिला आता केवळ घरातील कामांपुरत्या मर्यादित न राहता शेती व्यवसायातही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे येत आहेत. येथील महिलांनी एकत्र येत 'गट शेती'चा एक आदर्श पायंडा पाडला आहे. शेतातील मशागतीपासून ते पिकांची काळजी घेण्यापर्यंतची सर्व कामे महिला अतिशय आत्मविश्वासाने आणि नियोजनबद्ध पद्धतीने करत आहेत. शेतीतील वाढता उत्पादन खर्च आणि मजुरांची टंचाई यावर मात करण्यासाठी गावातील महिलांनी एकत्र येत गट शेतीची संकल्पना राबवली आहे. एकमेकींच्या शेतात मोफत सहकार्य करून काम केल्याने मजुरीवरील खर्च मोठ्या प्रमाणावर वाचत आहे. पारंपरिक पद्धतीनुसार बैलजोडीच्या साहाय्याने शेतातील कोळपणी, नांगरणी व आंतरमशागतीची कामे महिला स्वतः करत आहेत.

सोयाबीन आणि इतर पिकांच्या मशागतीसाठी महिलांनी कामांची विभागणी केली आहे. यामुळे काम वेळेत पूर्ण होऊन पिकांची उत्तम निगा राखली जात आहे. महालिंगराय वाडीतील या महिलांचा हा उपक्रम परिसरातील इतर गावांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरत असून, ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणाचे एक नवे चित्र या निमित्ताने समोर येत आहे. गट शेतीमुळे आमचा आत्मविश्वास वाढला गट शेतीमुळे आमचा आत्मविश्वास वाढला आहे. एकत्र येऊन काम केल्याने कामाचा ताण जाणवत नाही आणि खर्चातही बचत होते. महिलांनी शेतीत उतरून स्वयंपूर्ण व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे.

# पैठणला मोसंबीचे भाव ३५ वरून १५ हजारांवर

## दिल्लीच्या बाजारपेठेत आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणामधून मोठी आवक

पैठण। प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील मोसंबी उत्पादक शेतकरी सध्या तिहेरी संकटात सापडले आहेत. पावसाने दडी मारल्याने आंबे बहारातील मोसंबीची फळगळ होत असतानाच, दुसरीकडे बाजारभावात घसरण झाली आहे. काही महिन्यांपूर्वी ३५ ते ४० हजार रुपये प्रतिटन मिळणाऱ्या मोसंबीला आता १० ते १५ हजार रुपये प्रतिटन भाव मिळत आहे. यामुळे उत्पादन खर्च भागवणेही कठीण झाले आहे. त्यातच आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणातून दिल्लीच्या बाजारपेठेत मोसंबीची आवक होत असल्याने पैठण–पाचोडच्या मोसंबीसमोर बाजारपेठीय स्पर्धा आहे. पैठणची मोसंबी पूर्वी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि पंजाबच्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्री होत होती.



मात्र, सध्या आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणातून दररोज मोठ्या प्रमाणात मोसंबी उत्तर भारतातील बाजारपेठांमध्ये दाखल होत आहे. पुरवठा वाढल्याने मागणीच्या तुलनेत बाजारात माल पडून राहत आहे, ज्याचा परिणाम मोसंबीच्या दरावर झाला आहे. बागेची नियमित पाहणी करून आवश्यक फवारण्या कराव्यात, असा सल्ला तालुका कृषी अधिकारी विकास पाटील यांनी दिला आहे. तर शेतकऱ्यांना तातडीने मार्गदर्शन करावे, अशी मागणी किशोर तांगडे, दीपक मोरे आणि किशोर दसपुते यांनी केली आहे. परराज्यातील मोसंबीच्या आवकेचा उत्पादकांना फटका बसला आहे. आवक नियंत्रित झाल्यानंतरच दिलासा मिळेल, असे व्यापारी इरफान बागवान यांनी सांगितले. बाजारात आवक होत असल्याने भाव घसरले आहेत. आवक घटल्यानंतर भावात सुधारणा शक्य असल्याचे बाजार समितीचे सचिव नितीन विखे यांनी सांगितले. पावसाने दडी मारल्याने आंबे बहारातील मोसंबीची फळगळ मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यात व्यापारीही शेतकऱ्यांकडून हीच संधी साधून कमी दराने मोसंबीची मागणी करीत आहेत. पुढील महिन्यात सण, उत्सव असून, इतर राज्यातून होणारी मोसंबीची आव कमी होण्याची शक्यता आहे. त्यानंतरच मराठवाड्यातील मोसंबीला मागणी वाढेल आणि शेतकऱ्यांना चांगला दर मिळेल, असे व्यापाऱ्यांनी सांगितले. मात्र, तोपर्यंत सुरू असलेली फळगळ रोखण्याचे आव्हान आहे.

# एम.एम.निऱ्हाळी विद्यालयाच्या विद्यार्थिनींकडून पोलीस बांधवांना राख्या; रक्षाबंधनाचा उपक्रम !



पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी शहरातील एम.एम.निऱ्हाळी विद्यालयातील विद्यार्थिनींनी यंदाचा रक्षाबंधन सण अत्यंत उत्साहात आणि सामाजिक भान जपत साजरा केला शाळेच्या या उपक्रमांतर्गत विद्यार्थिनींनी पाथर्डी पोलीस ठाण्याला भेट देऊन अहोरात्र नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असणाऱ्या पोलीस बांधवांना राख्या बांधून त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली या प्रसंगी पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्यासह पोलीस कर्मचारी निवृत्ती आगरकर संदीप मुरकुटे रोहन खंडागळे नागेश वाघ गोपाळ ढवळे तसेच इतर पोलीस कर्मचारी बांधवांना विद्यार्थिनींनी आपुलकीने रक्षासूत्र बांधले पोलीस बांधव स्वतःच्या सणउत्सवांची पर्वा न करता अहोरात्र आपले संरक्षण करतात त्यांच्यामुळेच आपण समाजात सुरक्षित राहू शकतो त्यामुळे त्यांचा आदर राखणे आणि त्यांच्या या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे अशी भावना इयत्ता १० वी मधील विद्यार्थिनी प्रतीक्षा भाबड हिने या वेळी व्यक्त केली या उपक्रमावेळी विद्यालयाचे प्राचार्य संजय घिगे महादेव आव्हाड पर्यवेक्षक माणिक पालवे बाळासाहेब घुले प्रा.जनार्दन बोडखे रामनाथ चौधर गणेश सरोदे रवी गीते यांच्यासह शिक्षिका अपर्णा शेळगावकर सुरेखा वाघमोडे भारती सोलाट आणि इतर शिक्षक–कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते विद्यार्थिनींच्या या उपक्रमाचे पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष कौतुक करण्यात आले.

# नवीन पोलीस स्टेशन इमारतीचा भूमीपूजनाचा सोहळा संपन्न

जालना । प्रतिनिधी

गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्या माध्यमातुन मंजुर झालेल्या चंदनझिरा पोलीस स्टेशनच्या नविन इमारतीचे बांधकामाचा भूमीपूजन सोहळा २७ ऑगस्ट रोजी एमआयडीसी भागातील त्रिमुर्ती चौकामध्ये असलेल्या पोलीस स्टेशनच्या नियोजीत जागेवर आ. अर्जुन खोतकर ,आ. नारायण कुचे यांचे हस्ते संपन्न झाला.



सदर भूमीपूजन कार्यक्रम प्रसंगी पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी, जेष्ठ उद्योजक घनशामजी गोयल, माजी नगराध्यक्ष भास्करराव आंबेकर, उद्योजक सतिष गोयल, डी. बी. सोनी, अर्जुन गेही व अन्य उद्योजक तसेच जालना महानगरपालिका मधील सर्वपक्षीय सन्माननीय नगरसेवक, विविध गावचे पोलीस पाटील व सरपंच, नागरीक तसेच उविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, पोलीस उपअधिक्षक आर्थिक गुन्हे शाखा श्री. बाळासाहेब पवार, जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन व पोलीस शाखांचे प्रभारी पोलीस अधिकारी तसेच सर्व शासकीय कार्यालयांचे प्रमुख व सर्व पत्रकार, वार्ताहर व प्रतिनिधी उपस्थित होते. भूमीपूजन कार्यक्रमाचे वेळी पोलीस मुख्यालयाचे पोलीस बॅण्ड पथकाच्या वतीने शिस्तबध्द वाद्य वाजवुन सर्व प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. पोलीस निरीक्षक चंदनझिरा श्री. किरण बिडवे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.

# नायगावचे मयूर अभयारण्य अतिक्रमणाच्या विळख्यात

# अभयारण्यातून संगणमताने होते खैराच्या लाकडाची तस्करी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातच नाही तर देशभरात प्रसिद्ध असलेले बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील नायगाव येथील मयूर अभयारण्य सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडले असून आजूबाजूच्या शेतकऱ्यांनी अभयारण्याच्या जमिनीवर ताबा केला आहे. तर अनेक ठिकाणी स्वतःचे शेड बांधून स्वतःची जागा असल्यासारखे अनेकजण येथे रहात आहेत किंवा आपली गुरेढोरे बांधत आहेत. विशेष म्हणजे खैराच्या लाकडाची या ठिकाणाहून वनविभागाच्या सहकार्याने तस्करी होत असल्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. याशिवाय मयुराच्या मांसाचीही चोरून लपून तस्करी होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणाची वरिष्ठांनी प्रत्यक्ष भेट देऊन चौकशी करावी अशी मागणी परिसरातील नागरिक करीत आहेत.



संपूर्ण देशात प्रसिद्ध असलेल्या नायगाव मयूर अभयारण्या मधून मोठ्या प्रमाणात मयुरांचे मास विक्रीसाठी बाहेर जात असल्याचा गेल्या अनेक दिवसापासून संशय आहे. या प्रकरणांमध्ये काही आरोपींना ताब्यात घेण्यात आले होते. मात्र नंतर हे प्रकरण थंड झाले. आता पुन्हा या परिसरामध्ये परिसरातील लोक अतिक्रमण करीत असून वन विभागाच्या जमिनी ताब्यात घेऊन त्या ठिकाणी शेड उभारण्याचे उद्योग काहींनी सुरू केले आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये वन अधिकाऱ्यांनी हे अतिक्रमण हटवले होते. मात्र आता पुन्हा वन अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याने अतिक्रमण होतांना दिसत आहे. याशिवाय मोरांना मारून त्यांचे मास विक्री होत असल्याचाही दाट संशय व्यक्त केला जात आहे. मध्यंतरीच्या काळात हा प्रकार थांबला होता. मात्र आता पुन्हा सुरू झाल्याचे सांगण्यात येत आहे. याशिवाय या परिसरात असलेल्या मजबूत अशा खैराच्या लाकडाची तस्करी मोठ्या प्रमाणात होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. हे लाकूड मजबूत असल्याने याचा विविध वस्तूंसाठी वापर केला जातो. मात्र आता खैराचे लाकूड मिळणे दुरापास्त झाले आहे. फक्त वनविभागाच्या जंगलामध्येच हे सापडते. या परिसरात खैराच्या लाकडाची मोठ्या प्रमाणात उपलब्धता असल्याने याठिकाणी खैराच्या लाकडाची चोरट्या मार्गाने तस्करी होऊन यातून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याचे दिसत आहे. यात वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी गुंतले असल्याची चर्चा परिसरातील नागरिक करत आहेत. काही लोक खैराच्या लाकडाच्या तस्करी मध्ये गुंतलेले असून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या लाकडाची तस्करी करून यातून लाखो रुपयांचा नफा मिळवण्याचा उद्योग जोरात चालू असल्याचे परिसरातील नागरिक सांगत आहेत. या सर्व गैरप्रकाराला आळा घालण्यासाठी आता वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनीच यात लक्ष घालून हा प्रकार थांबवावा अशी मागणी परिसरातील नागरिकांतून केली जात आहे.

# महसूल प्रशासनाच्या चिरीमिरीने हमालांच्या जमिनीवर वारसांचा डोळा

### तहसीलदार रूईकर यांच्या भूमिकेवर संताप! गट नं.२५ मधील कथित फेरफारांच्या चौकशीची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

गरीब हमाल-मापाडी कामगारांनी कष्टाची कमाई एकत्र करून घेतलेल्या मनुर शिवारातील गट नं. २५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या मालकीचा वाद आता चिघळला आहे.या जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या कथित फेरफारांवरून तहसील प्रशासनाच्या कारभारावरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले



आहे.आंबेडकरी विचार मोर्चा व आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीम (बापू)यांनी तहसीलदारांना निवेदन देत या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही,तर १ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मनुर शिवारातील गट नं.२५ येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनातील माहितीनुसार, संबंधित जमीन हमाल-मापाडी कामगारांनी वर्गणी जमा करून तसेच बाजार समितीच्या आर्थिक मदतीतून घेतली होती.तत्कालीन अध्यक्ष मयत भुजाबा खांडेकर यांच्या नावावर खरेदीखत करण्यात आले.त्यानंतर खांडेकर यांनी या जमिनीवर एन.ए.लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखत करून दिला आहे.मात्र, अशिक्षित व निरक्षर असल्याने अनेक हमालांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पी.टी.आर. घेतली; ७/१२ च्या मालकी रकान्यात मात्र त्यांची नावे आली नाहीत.याच त्रुटीचा फायदा घेत खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांनी ७/१२ वर स्वतःची नावे लावून घेतली आहे.या सर्व प्रकारात महसूल यंत्रणेतील तलाठी,मंडळ अधिकारी आणि तहसीलदारांनी चिरीमिरी घेऊन प्रकरण दाबले आहे.संबंधित फेरफार नेमक्या कोणत्या कागदपत्रांच्या आधारे झाले ?हमालांकडे खरेदीखत असताना पान ३ वर

# दत्तधाम येथील श्रीदत्त मंदिरात जयदत्त क्षीरसागर यांचे दर्शन

बीड । प्रतिनिधी

गुरुवारनिमित्त माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दत्तधाम येथील श्रीदत्त मंदिराला सदिच्छा भेट देत दत्तप्रभूंचे दर्शन घेतले. यावेळी लोकसहभागातून नव्याने उभारण्यात आलेल्या मंदिराची पाहणी करून त्यांनी मंदिर उभारणीच्या उपक्रमाचे कौतुक केले.

दत्तधाम येथे भाविकांसाठी उभारण्यात आलेल्या श्रीदत्त मंदिरात गुरुवारनिमित्त धार्मिक वातावरण



होते. यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी मंदिरात पान ३ वर

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाची दमदार टीम जाहीर

### कार्यकारिणीत समाजातील सर्व घटकांना प्रतिनिधित्व देण्याचा योग्य प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी जिल्हा युवा मोर्चाची कार्यकारिणी घोषित केली आहे. युवा मोर्चाच्या या नव्या दमदार टीममध्ये समाजातील सर्व जाती धर्माच्या युवकांना प्राधान्य देऊन एक चांगला संदेश देण्यात आला आहे.

ना. पंकजाताई मुंडे यांनी जिल्ह्यात भाजपची संघटनात्मक फळी मजबूत करण्याच्या दृष्टीने युवा मोर्चाच्या माध्यमातून युवकांना न्याय दिला आहे. नव्या कार्यकारिणीत समाजातील ओबीसी, मायक्रो ओबीसी, मराठा, मुस्लिम, मागासवर्गीय आदी विविध जाती धर्माला प्रतिनिधित्व देण्याचा योग्य प्रयत्न करण्यात आला आहे. यात ७ सरचिटणीस, ११ उपाध्यक्ष, १५ सचिव, १० सदस्य आणि एक कोषाध्यक्ष यांचा समावेश आहे.

**प्रत्येकांना न्याय देण्याचा प्रयत्न करू – ना. पंकजाताई**

संघटनेत असंख्य कार्यकर्ते असताना प्रत्येकांना पदं देणं, यात सामावून घेणं माझ्यासाठी कठीण होतं, तरी देखील प्रत्येकांना संधी दिली आहे. भविष्यात वेगवेगळ्या माध्यमातून प्रत्येक कार्यकर्त्यांस न्याय देण्याचा माझा प्रयत्न असेल असे ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

**अशी आहे नवी कार्यकारिणी**

युवा मोर्चाची जिल्हा कार्यकारिणी पुढीलप्रमाणे सरचिटणीस – चंद्रकांत देवकते (परळी), संग्राम बांगर (बीड), युवराज वायबसे, किशोर खोले (आष्टी), विष्णू आगे (माजलगाव), विकास पवार (गेवराई), उत्तरेश्वर र्निगुळे (केज), उपाध्यक्ष – संतोष सोळंके (परळी), विलास काचगुडे (अंबाजोगाई), पान ३ वर

# वाहतुकीचा मार्ग मोकळा; भाजी मंडईतील विक्रेत्यांना पोलिसांच्या सूचना

बीड । प्रतिनिधी

शहरातील भाजी मंडई परिसरात रस्त्याच्या कडेला फळे व भाजीपाला विक्री करणाऱ्या विक्रेत्यांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, तसेच शाळकरी विद्यार्थी आणि पायी चालणाऱ्या नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी प्रोबेशनरी डी वाय एस पी भरत पांढरे

जिल्हा वाहतूक शाखेचे



प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय कुकलारे, पोलीस हवालदार त्रिंबक कुडके, फुलचंद जाधव, आजिनाथ मुंडे, शेषनारायण गाडे, पोलीस अंमलदार वसीम शेख, संतोष मोरे, महिला अंमलदार उषा गाडे, पोलीस हवालदार राजाभाऊ तांदळ व यांच्या सहकाऱ्यांनी केली.

जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने विक्रेत्यांना सूचना देण्यात आल्या. त्यानुसार रस्त्याच्या कडेला असलेल्या विक्रेत्यांना योग्य ठिकाणी हटवून वाहतुकीसाठी मार्ग मोकळा करण्यात आला.

भाजी मंडई परिसरात दररोज नागरिकांची तसेच वाहनांची मोठी वर्दळ असते. फळे व भाजीपाला विक्रेते पान ३ वर

# दशनाम गोसावी समाज परिषद व मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषदेचे राज्यस्तरीय महाअधिवेशन उत्साहात

बीड । प्रतिनिधी

दशनाम गोसावी समाज परिषद, बीड आणि मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय महाअधिवेशन उत्साहात संपन्न झाले. या अधिवेशनातून मराठवाड्यातील देवस्थान इनाम जमिनींच्या प्रश्नावर शासनाचे लक्ष वेधण्यासोबतच समाजाच्या विविध मागण्यांसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

महाअधिवेशनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज चौकातून आद्यगुरू शंकराचार्यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी इनाम जमिनींच्या प्रश्नाबाबत जनजागृती करण्यासाठी रॅलीही काढण्यात आली.



रॅलीमध्ये दशनाम गोसावी समाजासह गुरव, ब्राह्मण, बैरागी, नाथपंथी गोसावी तसेच भटक्या-विमुक्त समाजासाठी कार्य करणारे विविध घटक सहभागी झाले. दशनाम गोसावी समाज परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन यांनी इनाम जमीन धोरणामुळे समाजावर निर्माण झालेल्या अडचणींकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त केली. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या इनाम जमिनींच्या प्रश्नावर ठोस निर्णय घेऊन समाजाला न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. महाअधिवेशनात समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी योगदान देणाऱ्या इतर समाजातील व्यक्तींचा विविध पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला. यामध्ये समाज मित्र पुरस्कार, जीवन गौरव पुरस्कार, समाजभूषण पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार, धार्मिक पुरस्कार, महिला सन्मान, कर्तृत्वशील कुटुंब सन्मान तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. दशनाम गोसावी समाज परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन, राज्य अध्यक्ष ओमप्रकाश गिरी, प्रमुख मार्गदर्शक तथा धर्मगुरू महंत दत्तात्रेय महाराज यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने अधिवेशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# श्री गहिनीनाथ समाधी स्थळाचा कायापालट कधी होणार?

पाटोदा । प्रतिनिधी

महाराष्ट्रभर गाजलेल्या नवनाथांपैकी एक असणाऱ्या प्रमुख सिद्धपुरुष श्री गहिनीनाथ महाराज यांचे संजीवन समाधी स्थान असणारा गड पाटोदा शहरापासून अवघ्या वीस ते पंचवीस किलोमीटर अंतरावर आहे. मात्र, इतके जवळ असूनही आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या काऱ्याकोपऱ्यातून भाविक भक्त नित्य नियमाने येथे येत असतानाही, हा गड प्रशासनाच्या आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षिततेचा बळी ठरत आहे.

**मंदिरातील ऐतिहासिक ठेवा आणि सद्यस्थिती**

गडावरील मुख्य श्री गहिनीनाथ समाधी मंदिराच्या प्रांगणात प्रवेश केल्यावर प्राचीन वास्तुकला दिसून येते. येथील गाभाऱ्यात श्री विष्णु भगवान तसेच जगतगुरू संत तुकाराम





महाराज यांची मूर्ती असून भाविक येथे श्रद्धाभावाने पूजा करतात. मंदिराच्या भिंती आणि परिसराची रचना अत्यंत जुनी असून, ऐतिहासिक वास्तूच्या स्वरूपात असलेल्या या ठेव्याचे जतन होणे काळाची गरज आहे. मात्र, योग्य





निगा न राखल्यामुळे हा ऐतिहासिक वारसा धोक्यात आला आहे.

**मूलभूत सुविधांचा अभाव; भाविकांची हेळसांड**

पाटोदा शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या या गडावर पान ३ वर

# शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्रीमंत मुंडे यांचा दणदणीत विजय



वडवणी । प्रतिनिधी

चिखलबीड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्रीमंत विठ्ठल मुंडे यांची निवड झाल्याने स्थानिक राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे वडवणी तालुकाध्यक्ष ॲड. विकास मुंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या निवडीत मुंडे गटाने आपले संघटनात्मक बळ पुन्हा एकदा दाखवून दिल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरू आहे.

शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया नुकतीच पार पडली. यावेळी अध्यक्षपदासाठी श्रीमंत विठ्ठल मुंडे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. तसेच समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांचीही निवड करण्यात आली. शाळेच्या विकासाचा अजेंडा केंद्रस्थानी नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीमंत विठ्ठल मुंडे यांनी पदभार स्वीकारताना शाळेच्या सर्वांगीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा, स्वच्छ व सुरक्षित शालेय पान ३ वर

# आज श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

### भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे –शांतीब्रह्म नवनाथ बाबा

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत सद्‌गुरू किसान बाबा महाराज यांच्या २८ व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता आज दि.२८ ऑगस्ट शुक्रवार रोजी महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकार संजयजी महाराज पाचपोर रामायणाचार्य यांचे काल्याचे किर्तन दुपारी १२ ते २ वाजता होणार आहे. काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाच्या महापंगती होणार आहे.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आज येथे पौर्णिमा निम्मित सदगुरु ह.भ.प.वै.किसान बाबा महाराज यांची पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न होणार आहे पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार आहे या पुण्यतिथी निमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सांगता कार्यक्रमास सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गुरुवर्य शांतीब्रम्ह ह.भ.प. नवनाथ बाबा महाराज मठाधिपती महंत श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांनी केले आहे



श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे आज अखंड हरिनाम सप्ताह सांगता होणार आहे या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये दि. २८ ऑगस्ट शुक्रवार रोजी पौर्णिमा निम्मित सदगुरु ह भ प वै. किसन बाबा महाराज यांच्या पुण्यतिथी निम्मित सकाळी पालखी मिरवणूक सोहळा पार पडणार आहे. गुरुवर्य शांतीब्रम्ह नवनाथ बाबा गुरु किसन बाबा महाराज यांच्या समाधी पूजन होणार महायोगी गोरक्षनाथ महाराज मंदिर अभिषेक व संत साधू बाबा यांची आरती होणार आहे नंतर दत्तगुरु पूजन आरती करण्यात येणार आहे.या नंतर श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा हि गुरुवर्य सदगुरू किसान बाबा महाराज यांनी सुरू केली होती हि गर्भगिरी पर्वत प्रदक्षिणा होईल.

गोरक्षनाथ टेकडी येथे येणाऱ्या भाविक भक्तांच्या साठी पार्किंग, बैठक व्यवस्था, महाप्रसाद वाटप व्यवस्था करण्यात आलेली आहे. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये काकडा भजन, विष्णू सहस्रनाम ,ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन हरिपाठ, प्रवचन, हरी किर्तन, संगीत भजन, भारुड, हरिजागर, असे सात दिवसात चोवीस तास हरिनामाचे नामस्मरण करण्याचे कार्य श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे करण्यात आले. या सर्व हरिनामाच्या कार्याची सांगता उद्या होणार आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26